RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

Volume - 73 | Issue-182 | Marathi Daily | Monday 24/3/2025 | Pages - 6 | Price- Rs. 3








शुभेच्छुक –

Raj PALACE

हॉटेल राज पॅलेस

बार रेस्टॉरंट । फॅमिली टेरेस गार्डन
लॉजिंग । बँक्वीट हॉल
टिळक रोड, अहमदनगर.

Mob.8888461111 / 8888462222 Ph.No. - 0241/2422222/2221


## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



चौंकशी पथकाच्या धाडी पडल्या तर दिलखुलास हास्य तोंडावर ठेवून, ही सारी प्रॉपर्टी आताच्या पैंशातली नसून आजोबा-पणजोबांच्या काळातल्या पैंशातून घेतलीय असा आविर्भाव दाखवायचा...समजलं?

## निवडक

### कुणाल कामराच्या गाण्याचे विधानसभेत पडसाद

**मुंबई, दि.२४–** स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या एका गाण्यावरून रविवारी संध्याकाळपासून मोठी चर्चा सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या शिवसेनेला लक्ष्य करणारं एक विनोदी गाणं कुणाल कामराने आपल्या स्टँडअप कॉमेडी शोमध्ये गाऊन दाखवलं. त्याच्या या गाण्याचे विधानसभेत तीव्र पडसाद उमटले आहेत. कुणाल कामराने मुंबईच्या युनिकॉन्टिनेंटल हॉटेलमध्ये कॉमेडी शो केला. या शोमध्ये एकनाथ शिंदे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत हिंदी गाण्यांचे रिमिक्स करून त्याने गाणी म्हणून दाखवली. यावरून आता मोठा वाद सुरू झाला आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी या क्लबची तोडफोड केली. एकीकडे तोडफोड करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असताना दुसरीकडे कुणाल कामराविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### इच्छुकांवर निवडणुकीची प्रतीक्षा करण्याची वेळ

# जिल्हा परिषद, महापालिकेत अजून किती दिवस प्रशासकराज?

**समाचार/नगर-दि.२४**

जिल्हा परिषदेत अडीच वर्षांपासून आणि महापालिकेत दीड वर्षांपासून प्रशासक राज सुरू आहे. तेव्हापासून या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांची सूत्रे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आहेत. मात्र, अजून तरी लवकर निवडणूक होण्याची कोणतीही चिन्हं दिसत नाहीत. आणखी किती दिवस प्रशासकराज राहणार, असा प्रश्न निवडणुकीच्या प्रतीक्षेत असलेल्या इच्छुकांना पडला आहे.



लोकसभा आणि त्यानंतर विधानसभा निवडणूक पार पडली. त्यानंतर मार्च-एप्रिल महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होईल, असा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात होता. त्यामुळे इच्छुक उमेदवारांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. तसेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत माजी जिल्हा परिषद, माजी नगरसेवकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात लोकसंपर्क वाढविला होता. परंतु, आता स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या निवडणुकीचा मुहूर्त ठरत नसल्याने प्रशासक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर हे जिल्हा परिषदेचा आणि आयुक्त यशवंत डांगे हे महापालिकेचे कामकाज सांभाळत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्हा परिषदेचे ५२ कोटींचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यांनी सलग तीन वेळेस अंदाजपत्रक सादर केले आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी महापालिकेचे सन २०२५-२६ चे १६८० कोटीचे अंदाजपत्रक सादर केले. ३४६.०७ लाखाच्या शिलकीचे हे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे.

#### नेत्यांकडून उमेदवारीचा शब्द

विधानसभा निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक होईल, अशी अपेक्षा होती. याच निवडणुकीवर डोळा ठेवून इच्छुकांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवारांसाठी मताचा जोगवा मागत आपल्या निवडणुकीची रंगीत तालीम केली. नेत्यांनीही उमेदवारीचा शब्द देत इच्छुकांना कामाला लावले. मात्र, ओबीसी आरक्षणासंदर्भात न्यायालयाकडून अद्याप निर्णय आलेला नाही. यामुळे इच्छुकांनी आपले नियोजन गुंडाळले आहे.

### संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी हत्येप्रकरणी न्याय द्या

## नगरमध्ये १३ एप्रिलला महा जनआक्रोश मोर्चा

**समाचार/नगर-दि.२४**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी आम्हाला न्याय द्या, या मागणीसाठी सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने येत्या १३ एप्रिलला अहिल्यानगर शहरात महाजनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात शनिवारी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीत मोर्चाच्या नियोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले. जिल्हाभरातून नागरिक या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या निर्घृण हत्येने राज्यभर मोठी खळबळ उडाली. याबाबत न्याय मिळावा, यासाठी मुंबईसह राज्यभर मोर्चे काढण्यात आले. सरपंच संतोष देशमुख यांचे कुटुंबीय त्यामध्ये सहभागी झाले. संतोष देशमुख आणि सोमनाथ सुर्यवंशी या दोन्ही घटनांमध्ये सरकारने अजून सखोल तपास करण्याची गरज असून त्यासाठीच सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चा आग्रही आहे. त्यासाठी राज्यभर मोर्चे निघत असून आता अहिल्यानगर शहरातही येत्या १३ एप्रिलला मोर्चा काढण्यात येणार आहे. यासंदर्भात शनिवारी कोहिनूर मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीत नगर शहरात मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी झालेल्या (पान ३ वर)

### भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई

## मुकुंदनगरमध्ये ७०० किलो गोमांस पकडले

**समाचार/नगर-दि.२४**

गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध भिंगार कॅम्प पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई मुकुंदनगर भागात करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना माहिती मिळाली की, मुकुंदनगर भागातील वाबळे कॉलनी शेजारी पार्किंगच्या पत्राच्या शेडमध्ये एक इसम गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करीत आहे. त्यांच्या सूचनेवरून अंमलदारांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता, एक जण गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करताना आढळला. त्याने त्याचे नाव सलीम मुसा शेख (रा. कोठला, घास गल्ली) असे असल्याचे सांगितले. त्याच्याकडे मालकाबाबत व शेड कोणाचे आहे. याबाबत विचारणा केली असता त्याने सदर गोमांस हे तौसीफ कुरेशी आणि इरशाद कुरेशी (पान ३ वर)


उपवासाची कारणे अनेक,
शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
CAMEL SAGO® ATUL FOOD PRODUCTS
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

**3BHK फ्लॅट भाड्याने पाहिजे**

अहिल्यानगर, सावेडी भागामध्ये प्रशस्त, सर्व सोयींनीयुक्त 3BHK फ्लॅट भाड्याने घेणे आहे.
कृपया फक्त घरमालकांनीच संपर्क करावा.
मध्यस्थ/एजंट क्षमस्व.

संपर्क : 9511248882 (वेळ : स. 10 ते संध्या. 5)

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दि.२१/०३/२०२५ ते दि.२७/०३/२०२५




SNOW WHITE (हिंदी)
12.45 PM 6.00 PM
08.15 PM

RD (मराठी)
02.30 PM

गाव बोलावतो (मराठी)
07.15 PM

हार्दिक शुभेच्छा (मराठी)
01.30 PM

सैराट (मराठी)
03.45 PM

छावा (हिंदी)
07.30 AM 09.30 AM
10.30 AM 03.00 PM
07.00 PM 10.00 PM
10.30 PM

THE DIPLOMAT (हिंदी)
09.00 AM 11.45 AM
04.30 PM 09.45 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show | CONNPLEX | AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

संपादकीय

# राज्याचा विकास वेगाने, पण...

२०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नामध्ये दोन लाख ७८ हजार रुपयांवरून ३ लाख ९ हजार रुपयांपर्यंत वाढ झाली असली, तरी देशपातळीवर दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो. गुजरातने निर्यातीबरोबर दरडोई उत्पन्नातही महाराष्ट्राला मागे टाकून पुढचे स्थान पटकावले आहे. आधी तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात आणि नंतर मग महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. २०२३-२४ मध्ये राज्याचा विकासदर आठ टक्के होता. यंदा, म्हणजेच २०२४-२५ मध्ये घसरून तो ७.३ टक्क्यांवर येईल. याचा अर्थ 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे म्हटले जात असले, तरी तो फक्त प्रचाराचाच भाग आहे. उद्योगक्षेत्रात देशात वर्षानुवर्षे आपण अग्रेसर राहिलो. परंतु या क्षेत्राचा विकासदर गेल्या वर्षाच्या ६.२ टक्क्यांवरून घटून ४.९ टक्के होईल, असा अंदाज आहे. त्यातही उत्पादन किंवा निर्मितीक्षेत्रात २०२३-२४ मध्ये विकासदर ६.८ टक्के होता. घसरण होऊन यंदा तो ४.२ टक्के होण्याची शक्यता आहे. वास्तविक, शेतीमधून जास्तीत जास्त लोकांना बाहेर आणून उद्योगात सुस्थापित करायचे असेल तर निर्मितीक्षेत्राचा विस्तार व्हायला हवा. शेती आतबट्ट्याची असल्यामुळे, उत्पादनक्षेत्राची भरभराट होणे आवश्यक आहे. परंतु त्याऐवजी त्याच्या प्रगतीचा वेग मंदावणे, ही चिंतेची बाब आहे. उद्योगांप्रमाणे सेवाक्षेत्रात रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. पण सेवाक्षेत्रातही ८.३ टक्क्यांवरून ७.८ टक्के अशी पिछेहाट झाली आहे. आज महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक येत आहे, ही चांगली बाब आहे. परंतु त्या प्रमाणात रोजगारामध्ये वाढ होत असल्याचे दिसत नाही. गेल्या तीन वर्षांमध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या ५८ लाखांवरून ७० लाखांपर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्याचे बंधन शासनावर आहे. परंतु चालू आर्थिक वर्षात महायुती सरकारने या खर्चाला लक्षणीय प्रमाणात कात्री लावली आहे. तसेच डबल इंजिन सरकार असल्याचे सांगितले जात असले, तरी यंदा केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीमध्ये १९ टक्क्यांची घट होणार असल्याची माहिती आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला ९९३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मागील वर्षी सर्वत्र उत्तम पाऊस झाल्यामुळे शेती आणि संलग्न क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षात ३.३ टक्के असलेला विकासदर यंदा ८.७ टक्क्यांवर गेला. परंतु यात राज्य सरकारचा असा काहीच वाटा नाही. उलट, राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र नक्की किती वाढले, याची आकडेवारी गेली बारा वर्षे दिली जात नाही. महाराष्ट्रातील किरकोळ व्यापारात घट झाली आहे. म्हणजे, लहान-लहान दुकाने, चहा, किराणा वगैरे. त्याउलट ठोक व्यापारात रोजगाराचा टक्का वाढला आहे. वाहतूक सेवेतील रोजगाराची टक्केवारी कमी झाली आहे. पर्यटक, टॅक्सी, ऑटो रिक्षा यात आता पूर्वीसारखी रोजगारक्षमता राहिलेली नाही. शिक्षण क्षेत्रात काम करणारांच्या टक्केवारीत घट झाली आहे. दुसरीकडे, वस्त्रोद्योग म्हणजेच टेलरिंगचे लहान लहान व्यवसाय किंवा छोटे कारखाने यात रोजगाराचा टक्का वाढला आहे. यातील बहुसंख्य महिला आहेत आणि त्यांचे शिलाईचे अगदी लहान, घरगुती स्वरूपाचे व्यवसाय आहेत. इथे टक्केवारी वाढते आहे. आर्थिक निकड भागवण्यासाठी यातील बहुतेक व्यवसाय केले जातात. यातून कुटुंबांवर वाढलेला आर्थिक ताण दिसतो. टपऱ्यांवर अवलंबून असलेल्या रोजगाराचे प्रमाणही वाढले आहे. यातूनही वाढलेला आर्थिक ताण दिसून येतो. घरकामातून रोजगार मिळवणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढले आहे. वित्तीय सेवांमधील रोजगाराची टक्केवारी वाढली आहे. यात प्रामुख्याने पतपेढी वगैरे रोजगार आहे. शेतीबाहेर रोजगाराची टक्केवारी वाढत आहे, हे चांगले; पण त्यातील बराच रोजगार आर्थिक ताणातून काही तरी करण्याची गरज असल्यामुळे केलेला, कमी उत्पादक, कमी मोबदला असलेला, लहान धंदे बंद पडून होत असलेला अस्थायी स्वरूपाचा आहे हे चांगले नाही. हे निष्कर्ष भारत सरकारच्या 'पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे'वरून काढले आहेत. आज ग्रामीण महाराष्ट्राइतकी आर्थिक विषमता इतर कुठल्याही राज्यात नाही. पंजाब, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार वगैरे राज्यांमध्ये ग्रामीण दारिद्र्य आणि विषमता हे दोन्ही घटक राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहेत. पंतप्रधानाच्या आर्थिक सल्लागार समितीने देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात्तील महाराष्ट्राचा टक्का कमी झाल्याचा निष्कर्ष काढला आहे. पण महाराष्ट्राची 'आर्थिक पिछेहाट' झाली आहे किंवा नाही याबाबत ठोस निष्कर्ष काढायचा असेल, तर एवढेच पुरेसे नाही. देशाच्या औद्योगिकरणातील महाराष्ट्राचा टक्का कमी होत आहे. ही प्रक्रिया २०१४-१५ पासून अधिक वेगाने होत आहे. महाराष्ट्रातील रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. स्वयंरोजगार, खास करून महिलांचा स्वयंरोजगार वाढतो आहे. हा रोजगार प्रामुख्याने अगदी लहान-लहान व्यवसायातून आहे. यातील काही भाग तरी कुटुंबावर आर्थिक ताण वाढला, हे आहे. ग्रामीण महाराष्ट्रात दारिद्र्य आणि विषमता यांचे प्रमाण देशातील सरासरीपेक्षा जास्त आहे. एकूणच यावरून राज्याची आर्थिक स्थिती इतर काही राज्यांच्या तुलनेत घसरली आहे आणि शेतीव्यवस्थेने सध्या हात दिला असला, तरी उत्पादन आणि सेवाक्षेत्राने मात्र निराशा केली, असा त्याचा अर्थ आहे.महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे आणि देशात सर्वाधिक करमहसूल गोळा करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा अधिक आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्याने स्वतःचाच विक्रम मोडला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलिकडेच म्हटले. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करार केले. या करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के आहे. असे असले तरी भूखंडवाटप केले जात असताना होणारा भ्रष्टाचार, खंडणी याबद्दलच्या उद्योजकांच्या तक्रारी दूर होणे आवश्यक आहे.

# डॉ. पाऊलबुधे फार्मसीचे राष्ट्रीय कार्यशाळेत यश



**समाचार/नगर-दि.२४**

येथील वसंत टेकडी जवळील डॉ. ना.ज. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी होऊन नेत्रदिपक सुयश मिळविले. सोनई येथील मुळा एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह, बक्षीस देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.विनायक देशमुख डॉ.विजय तांबे प्राध्यापक घावटे, शिक्षक वृंद उपस्थित होते. अहिल्यानगर सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. ना.ज. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी होऊन त्यांनी तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले. फार्मसी कॉलेजच्या बी फार्मसी द्वितीय वर्षातील रितिका वाघ व पुजा दारकुंडे या विद्यार्थ्यांनी नोवेल फाइटोसिमल कॉम्प्लेक्स ऑफ पॅनो ग्रीन एक्स्ट्राक्ट बुस्टिंग बायो एव्हेलेबी अवेलेबिलिटी ग्री थेरपीटिक एपीकेस ऑफ एक्स्टेक्स या विषयाचा पोस्टर प्रेसेंटेशन केले. प्राचार्या अनुराधा चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.विनय पाऊलबुद्धे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल,खजिनदार श्री.रामकिसन देशमुख, सदस्य श्री.दादासाहेब भोईटे, संचालक श्री.साई पाऊलबुद्धे, प्रशासक डॉ. श्रद्धा पाऊलबुद्धे,बीएडच्या प्राचार्या डॉ.रेखाराणी खुराणा, फार्मसी चे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी फार्मसी च्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ. वेणू कोला,आदी सह शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# युजीसी-नेट परीक्षेत सौदागर लोंढे यांचे यश

**समाचार/नगर-दि.२४**

दृढ इच्छाशक्ती आणि अथक मेहनतीच्या जोरावर अनामप्रेम संस्थेचे माजी अंध विद्यार्थी व सध्या संस्थेत संगीत शिक्षकाची जबाबदारी समर्थपणे पेलणारे सौदागर लोंढे यांनी युजीसी-नेट परीक्षेत यश मिळवले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे अनामप्रेम संस्थेतील व देशातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.

लोंढे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अभ्यासात सातत्य ठेवले. योग्य मार्गदर्शन आणि कठोर मेहनतीच्या बळावर त्याने ही प्रतिष्ठित परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

या यशामुळे त्यास उच्च शिक्षण क्षेत्रात अनेक संधी मिळणार असल्याचे अनामप्रेम संस्थेच्या विश्वस्त डॉ.मेघना मराठे यांनी सांगितले आहे.सौदागरच्या उज्वल यशाबद्दल अनामप्रेमचे पालक डॉ गिरीश कुलकर्णी, अध्यक्ष अजित माने, सचिव अनिल गावडे यांच्यासह अनामप्रेम परिवाराने त्यांचा विशेष गौरव केला. संस्थेतील तज्ञ मार्गदर्शनामुळे आणि स्वतःच्या चिकाटीमुळे हे यश शक्य झाल्याचे सौदागर लोंढे यांनी सांगितले.

# मित ना मिला रे मन का...

अमिताभ बच्चन आणि जया भादुरी यांचे लग्न झाले, त्याच वर्षी त्यांचा 'अभिमान' चित्रपट प्रदर्शित झाला. अभिमान मधील पती-पत्नी दोघेही गायक पण जेव्हा जयाच्या नावाला किंमत येते, तेव्हा अमिताभ बच्चनच्या पुरुषी अहंकाराला डंख पोहोचतो आणि मग प्रेमाची भावना जलन, पराभव, घुसमट, कोंडमारामध्ये बदलते आणि नात्यात दरार येते. चित्रपटातील जया हा मानसिक धक्का पचवू शकत नाही आणि निराशेच्या खोल दरीत जाते.




आमच्या सायकॉलॉजिकल ॲस्पेक्टने बघितले तर ही सिव्हीअर डिप्रेशनची केस होईल. सतत उदास, भकास वाटणे,कुठल्याही गोष्टीत आनंद न वाटणे, पूर्वी ज्या कामात उत्साह वाटायचा त्या कामात उत्साह न वाटणे ही उदासीनतेच्या आजाराची लक्षणे आहेत. चित्रपटांमध्ये दाखवले गेले आहे तिने गाणे पूर्ण बंद केले. ज्यामध्ये तिला excessive guilt दाखवले आहे, की या सगळ्या वाईट परिस्थितीला फक्त मी आणि मीच जबाबदार आहे, असे तिला वाटत असते.

डिप्रेशन या आजाराचे दोन प्रकार आढळून येतात १)रिॲक्टिव्ह डिप्रेशन-: ज्यामध्ये काहीतरी घटना घडल्यामुळे येणारी उदासीनता असते. २) इंडोजेनस डिप्रेशन म्हणजे मेंदूमधील रासायनिक द्रव्यांचे असंतुलन झाल्यामुळे होणारा डिप्रेशनचा त्रास. वरील चित्रपटाचाच आपण विचार करूया...चित्रपटामध्ये जया भादुरीचा सुरुवातीचा काळ उत्तमरित्या साकारला आहे. जसे-जसे नात्यांमध्ये दुरावा येत गेला तसे-तसे तिचे मनःस्वास्थ्य बिघडायला सुरुवात झाली. आयुष्यात येणाऱ्या नकारात्मक घटनांमुळे त्या मनःस्तापाचे रूपांतर उदासीनता या आजारात झाले. वरील दोन प्रकारातील रिॲक्टिव्ह डिप्रेशनचा हा प्रकार. रिॲक्टिव्ह डिप्रेशन म्हणजे कुठल्यातरी एका नकारात्मक घटनेला मनाने दिलेली नकारात्मक प्रतिक्रिया! चित्रपटाच्या नंतरच्या भागामध्ये गरोदरपणात आणि बाळंतपणानंतर देखील जया भादुरीचे डिप्रेशन वाढण्याचे दाखविले आहे. ज्याला शास्त्रीय भाषेत 'पोस्टमार्टम डिप्रेशन' असे म्हणतात. आता आपल्या लक्षात येईल की चित्रपटांमधील दांपत्यामधील नात्यांमध्ये एवढी तणावपूर्ण परिस्थिती नसती तर डिप्रेशनचा आजार एवढा पुढे गेलाच नसता. मानवी आयुष्यामध्ये नातेसंबंधांना अनन्यसाधारण महत्त्व असते. एकंदरीतच टोळीने राहण्याचा नैसर्गिक स्वभाव धर्म असल्याकारणाने आपल्यामध्ये मूळतःच आधार शोधणे आणि आधार देणे याचा समावेश असतो. एकत्र रहात असल्यामुळे काही अपेक्षा या प्रत्येक नात्यातून असतात. परंतु मनुष्याचा स्वभाव गुणधर्म लक्षात न घेतल्यामुळे नातेसंबंध बिघडतात. त्यातूनच एकमेकांमध्ये ईर्षा, स्पर्धा, मत्सर या सर्व धोकादायक भावनांची सुरुवात होते. ज्यातून असुरक्षिततेची जाणीव भेडसावत राहते.

भावनेचे व्यवस्थापन लहान वयापासून मुलांना शिकवण्याची गरज असते. अभ्यासामध्ये,स्पर्धेमध्ये, कामाच्या ठिकाणी माझ्यापुढे इतर लोक पण असू शकतात याची जाणीव असेल तर व्यवसायात नोकरीच्या ठिकाणी कोणी पुढे गेल्यावर नात्यांमध्ये तणाव येईपर्यंत त्रास होणार नाही. परंतु याची मानसिक तयारी लहान वयात केली तर पुढे अशा समस्या निर्माण होणार नाहीत. आजकालची परिस्थिती बघता तरुणांचे भावनिक व्यवस्थापन म्हणजेच इमोशनल मॅनेजमेंट नक्कीच डळमळीत आहे हे प्रकर्षाने जाणवत आहे. वाढते घटस्फोटांचे प्रमाण हे त्याचेच पडसाद आहेत असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. यासाठी योग्य पावले उचलणे आवश्यक आहे असे वाटते. ज्यामुळे आपली लग्न संस्कृती टिकून राहण्यासाठी मदत होईल असे वाटते.

आता अभिमान चित्रपटातील अजून एक महत्त्वाचा भाग म्हणजे जया भादुरीच्या डिप्रेशनच्या ट्रीटमेंटबद्दलचा. अमिताभ जेव्हा डॉक्टरांना विचारतो की 'शॉक ट्रीटमेंट से कुछ फायदा होगा?' तर तो डॉक्टर चक्क नाही म्हणून सांगतो. त्याला म्हणतो,'नहीं नहीं वो बिमार थोडी ना हैं, सिर्फ सदमें का शिकार है!' खरंतर पोस्टमार्टम डिप्रेशनला ECT हा उत्तम उपचार आहे. चित्रपट माध्यम हे समाजावर प्रचंड प्रभाव पाडणारे माध्यम आहे. आधीच मानसिक आजाराविषयी समाजात खूप प्रश्न असतात त्यातून चित्रपटांद्वारे समाजाला असे दिशाभूल करणे म्हणजे अजूनच प्रश्न गहन केल्या प्रमाणे आहे. परंतु सध्या परिस्थिती बदलत आहे. गेल्या काही वर्षात मानसिक आजारावरील उपचार घेण्यासाठी रुग्णांची,नातेवाईकांची सहजता वाढत आहे. मानसिक स्वास्थ्याचे महत्व समाजाला पटू लागले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. प्रत्येक दिवसागणिक मानसिक अस्वास्थ्य, मनाच्या संबंधित समस्या याचे चित्र बदलत आहे. समाजातील विदारक परिस्थिती चा ऱ्हास करायचा असेल तर प्रत्येकाला स्वतःच्या आणि इतरांच्या भावभावनांविषयी जागरूक होण्याची खूप आवश्यकता आहे हे मात्र नक्की!

**-दीप्ती नीरज करंदीकर**
(क्लिनिकल सायकोलॉजिस्ट)




## राशीभविष्य

- **मेष** : आज महत्वाची कामे पुढे ढकलावीत. आर्थिक बाजू सांभाळा. कामात अडथळे निर्माण होतील.
- **वृषभ** : शुभकार्यासाठी दिवस चांगला. स्त्रीच्या नाजूक पाशात अडकाल. पर्यटनाची संधी साधाल.
- **मिथुन** : यश मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. कौटुंबिक सुख सामान्य राहील. खर्च वाढेल.
- **कर्क** : स्थावराचे व्यवहार सफल होतील. ताणतणाव कमी होईल. यशाचं शिखर गाठाल.
- **सिंह** : उत्सवाचा अभाव जाणवेल. खर्च करावा लागेल. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी राहतील
- **कन्या** : स्पर्धेचा ताण कमी होईल. अंगभूत गुणांना वाव मिळेल. कार्यक्षेत्रात दबदबा वाढेल.
- **तूळ** : पाहुण्यांची अनिच्छेने सरबराई करावी लागेल. मन थाऱ्यावर राहणार नाही. गुंतवणूक टाळा.
- **वृश्चिक** : ठरवलेली कामं मार्गी लागतील. चिंता कमी होतील. लांबचे प्रवास लाभदायक होतील.
- **धनु** : घरातील वादविवादापासून दूर रहा. योग्य निर्णय घेणं अवघड होईल. स्वार्थी लोकांपासून सावध रहा.
- **मकर** : आर्थिक स्थिती बिकट राहील. प्रवास म्हणजे समस्या वाटेल. सद्विवेकबुद्धी जागृत ठेवा.
- **कुंभ** : गोड बोलून कार्यभाग साधाल. सर्व बाबतीत आघाडी असेल. संकल्प सिद्धीस जातील.
- **मीन** : शासकीय कामास अनुकूल दिवस. आत्मविश्वास जागृत ठेवाल. नवपरिणीतांचे प्रश्न सुटतील.

## २५ मार्च — दिनविशेष

- **२०१३** : सहायक निरीक्षक सचिन सूर्यवंशी यांच्या निलंबनाच्या घोषणेनंतर विधिमंडळातील पेच सुटला.
- **२०१४** : सर्वोच्च न्यायालयाचे एन. श्रीनिवासन यांच्यावर कठोर ताशेर, भारतीय क्रिकेट मंडळाच्या अध्यक्षपदावरून दूर होण्याविषयी सूचना.
- **२०१६** : जम्मू-काश्मीरमध्ये भाजपचा 'पीडीपी'ला पाठिंबा.
- **२०१८** : केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे यांच्या मुलाविरुद्ध अरेस्ट वॉरंट काढण्यात आला.

## आरोग्यमंत्र — उपयुक्त केळाच्या साली

आरोग्यरक्षणाच्या आणि वर्धनाच्या दृष्टीनं केळाचं सेवन महत्त्वाचं असतं तसंच केळाच्या सालीच्या वापरानंही विविध लाभ मिळतात. आज त्याबाबत जाणून घेऊ या.

✻ केळाच्या सालीचा आतील भाग चेहरा तसंच मानेवर रगडा आणि अर्ध्या तासानं कोमट पाण्यानं धुवा. नियमितपणे हा उपाय केल्यानं त्वचेवरील सुरकुत्या कमी होतात. ✻ पिकलेल्या केळाची साल दातांवर घासली तर दातांचा पिवळेपणा जाऊन ते मोत्यासारखे चमकतात. ✻ केळाची साल चेहऱ्यावर हळूवारपणे चोळल्यास मुरूमे, पुटकुळ्या नाहीशा होण्यास मदत होते. केळाच्या सालीत अँटी-ऑक्सिडंटस असल्यानं त्वचेवरील पिगमेंटेशन, वांग, डाग, दूर होतात. ✻ केळाच्या सालीतले पांढरे धागे काढून त्यात ॲलोव्हेरा जेल मिसळून डोळ्याखाली लावल्यास डोळ्याखालील काळी वर्तुळे नाहीशी होतात. ✻ मधमाशीने डंख, दंश केला तर त्याठिकाणी केळाची साल बारीक करून लावल्यास आराम पडतो. ✻ एखाद्या ठिकाणी वेदना होत असेल तर त्या जागी ३० मिनिटांपर्यंत केळाची साल बांधून ठेवावी. आराम पडतो. ✻ त्वचेवर कोठेही मस किंवा चामखिळ असल्यास तिथे केळाची साल चोळावी. काही दिवसातच चांगले परिणाम दिसतात. ✻ प्रदूषणामुळे किंवा संगणकावर जास्त वेळ काम केल्याने डोळ्यांवर ताण येतो. अशावेळी केळाची साल डोळ्यांवर ठेवावी. यामुळे थंडावा मिळतो आणि त्यातील मिनरल्स डोळ्यांना मिळतात. त्यामुळे डोळे निवतात.



## महत्त्वाचं काही — प्राणी रंग कसे बदलतात?

सरडा रंग बदलतो तर काही सजीव आपल्या रंगामुळे निसर्गात अगदी सहज मिसळून जातात. काही फुलपाखरांचे पंख पानांसारखे वाटतात. त्यांच्या शिराही पानांवरच्या रेषांप्रमाणे दिसतात. यामुळे झाडाच्या खोडावर फुलपाखरू बसलं आहे हे पटकन लक्षात येत नाही. यामुळे शत्रूपासून त्यांचा बचाव होतो. झाडावर राहणाऱ्या बेडकांच्या काही प्रजाती रंग बदलतात. आता रंगबदलाची ही प्रक्रिया नेमकी काय आहे हे जाणून घेऊया. प्रत्येक सजीवाच्या शरीरात पेशी असतात. हृदय, फुफ्फुसासारखे अवयव आणि आपली त्वचाही याच पेशींपासून बनली आहे. यातल्या काही पेशींना मेलानोफोर असं म्हटलं जातं. या पेशींमध्ये रंगद्रव्यं असतात. त्याला पिगमेंट्स असं म्हटलं जातं. यामुळे त्वचेला रंग प्राप्त होतो. हिरव्या रंगाच्या पालींच्या शरीरात हिरवं रंगद्रव्य असतं. या पेशींवर मज्जासंस्थेचं नियंत्रण असतं. त्यामुळे गरजेनुसार पिगमेंट्सच्या संचयात बदल घडत जातात. वातावरणातला प्रकाश, तापमान, भीती किंवा धोक्याची जाणीव यामुळे पिगमेंट्सवर परिणाम होतो. यानुसारच सरडा तसंच इतर प्राण्यांमध्ये रंगबदलाची प्रक्रिया घडते.

## सल्ला मोलाचा — फॅशन मिनिएचर टॅटूजची

त्वचेचं नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवायचं आणि टॅटूची हौसही पुरवायची यातून मिनिएचर डिझाईनच्या टॅटूची चलती सुरू आहे. त्यांना 'मिनिमलिस्टिक टॅटू' असं म्हटलं जातं. अनेकदा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वापेक्षाही तिच्या शरीरावरच्या टॅटूजकडे पहिल्यांदा लक्ष वेधलं जातं. आपल्या सुंदर चेहऱ्यावर, त्वचेवर आणि एकूणच व्यक्तिमत्त्वावर टॅटू आक्रमण करतात असं वाटतं. म्हणून सौंदर्य खुलवणारे छोटेसे टॅटूज काढले जातात. त्यांच्यामध्ये विविध गोलाकार, मंडलं, भूमितीय आकृत्या, नाजूक पानं, फुलं, पक्षी यांनी यात मोठं स्थान पटकावलं आहे. प्राण्यांच्या आणि इतर चित्रांवरून व्यक्तीचे गुणधर्म समजतात असंही मानलं जातं. त्यामुळे त्याचा अभ्यास करून आपण कसं वाटावं या दृष्टीनंही टॅटूंची निवड केली जात आहे. शिवाय विविध प्रकारची रत्नं जडवलेले टॅटूही सध्या फॅशनमध्ये आहेत. यांत हिऱ्यापासून पाचूपर्यंतच्या रत्नांचा वापर केला जातो. हे 'जेम-टॅटू' अर्थातच सर्वांचं लक्ष पटकन वेधून घेतात.

## पंचांग

**मंगळवार, २५ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. ११, नक्षत्र: श्रवण
चंद्रराशी: मकर, योग: शिव
सूर्योदय: ६.४२, सूर्यास्त: ६.४९

## फॉरवर्डस

**कधी कधी यश हेच अनेकांच्या असुयेचं कारण ठरत असतं...**

नजरों मे दोस्तों की जो इतना खराब हैं,
उसका असूर है कि वो कामयाब हैं!

## वाचा तर खरं

तरूणाईला सिनेसृष्टीविषयी बरंच वेड असतं. सिनेसृष्टीतील कलाकारांचं दर्शन व्हावं, जमल्यास त्यांच्याशी संवाद साधता यावा, यासाठी तरूणाई विशेष उत्सुक असते. अशा उत्सुकतेपोटी बॉलिवूडच्या फेव्हरिट पर्यटनस्थळांना अवश्य भेट द्यायला हवी. ✻ दार्जिलिंग- भारतीय सिनेमांचं आवडतं रमणीय स्थळ म्हणजे दार्जिलिंग. नव्या जुन्या अनेक सिनेमांचं शुटिंग दार्जिलिंगमध्ये झालं आहे. मै हूं ना, जग्गा जासूस, बर्फी आणि परिणीता या चित्रपटांचं चित्रिकरण दार्जिलिंगमध्ये झालं आहे. सप्टेंबर ते मार्च हा दार्जिलिंगला येण्याचा सर्वोत्तम कालावधी आहे.

## कौशल्य विकास — आत्मविश्वास हरवू नका

समोरच्या व्यक्तीशी आय कॉन्टॅक्ट ठेवत संवाद साधणं, आत्मविश्वासपूर्वक मतप्रदर्शन करणं, आपल्या मतांविषयी ठाम असणं हे सगळे पैलू व्यक्तिमत्त्वाला वेगळी झळाळी देऊन जातात. मुख्यत: या गुणवैशिष्ट्याने परिपूर्ण व्यक्ती नेतृत्व करण्यास योग्य समजली जाते. प्रत्येक युवक-युवतीने संभाषणकौशल्य आणि त्याचबरोबर सर्वांसमोर स्पष्ट बोलण्याची कला अवगत करुन घ्यायला हवी. बरेच जण आपल्या विषयामध्ये पारंगत असतात मात्र समूहासमोर बोलताना त्यांना आत्मविश्वासाची कमतरता जाणवते. आत्मसंदेह आणि नकारात्मक विचार प्रभावी ठरून त्यांच्या कडून चुका होतात. सर्वांसमोर उभं राहून मुद्दा मांडताना भीतीमुळे शब्द अडखळणं, हातापायांमध्ये कंप जाणवणं, वारंवार जमिनीकडे बघणं, अतिरिक्त हातवारे करणं, श्रोत्यांकडे बघून न बोलणं यासारखे प्रकार अनुभवायला मिळतात. ही निश्चितच नकारात्मक बाब ठरते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्यातले दोष ओळखून ते दूर करायला हवे. वक्तृत्व प्रभावी ठरण्यासाठी प्रेझेंटेशनचाही आधार घेता येईल. लोकांसमोर बोलताना देहबोली पर्याप्त असावी. उपस्थित समुदायाला बरोबर घेत संवाद साधण्याचं कौशल्य साधायला हवं.



## खेचाखेची — हा तो फरक

**शिक्षिका** : सांग बंड्या, कंडक्टर आणि ड्रायवरमध्ये फरक काय असतो?

.
.
.
.
.
.

**बंड्या** : कंडक्टर झोपला तर कुणाचंचं तिकीट फाडलं जाणार नाही पण ड्रायवर झोपला तर सगळ्यांचं फाडलं जाईल.

## वेगळं काही

✻ ॲमेझॉनच्या जंगलामध्ये शनय-तिम्पिश्का नावाच्या नदीच्या पाण्याचं तापमान तब्बल ९१ अंश सेल्सियस आहे. ✻ रुमानियातल्या मोविल गुहांमध्ये गेल्या ५५ लाख वर्षांपासून प्रकाश पोहोचलेला नाही. या गुहेतलं पाणी सल्फरयुक्त आहे. तसंच इथल्या वातावरणात विषारी वायू आहेत. या गुहेतले सजीव गुहेबाहेर जिवंत राहू शकत नाहीत. ✻ इंग्लंडमधल्या नॉर्थ यॉर्कशायर भागातल्या एका टेकडीवरून येणारं पाणी चमत्कारिक आहे. या पाण्याच्या संपर्कात येणारी कोणतीही वस्तू दगडासारखी टणक होते. ✻ ऑस्ट्रियातल्या ग्रूनर सी पार्कमध्ये वसंत ऋतूमध्ये जाऊ नये. या काळात हे पार्क पाण्याखाली जातं. या बागेतली बाकडीही पाण्याखाली जातात.

## भटकंती — ट्रेकिंगचं नियोजन करताय?

आगामी उन्हाळी सुट्ट्याच्या पार्श्वभूमीवर तुमच्याकडे ट्रेकिंगचं प्लॅनिंग सुरू असेल तर काही ठिकाणांचा आवर्जून विचार करा.

✻ कर्नाटकमधल्या कूर्गमध्ये तादियंदामोल हे उंच शिखर आहे. या शिखरावर ट्रेकिंग करताना कूर्गचं विहंगम दृश्य दिसतं. हा ट्रेक सोपा आहे. त्यामुळे लहान मुलांसोबतही तुम्ही डोंगर चढू शकता. ✻ उत्तराखंडमध्ये चोप्टा-चंद्रशीला हा ट्रेक मुलांबरोबर करता येण्याजोगा आहे. ट्रेकिंगला नव्याने सुरूवात करणार असाल तर या ट्रेकला जा. या दरम्यान वेगवेगळे पक्षी बघायला मिळतील. हिरवागार निसर्ग, हिमालयातली शिखरं तुम्ही अनुभवू शकता. ✻ उत्तराखंडमध्ये व्हॅली ऑफ फ्लॉवर्स आहे. ऋषीकेशपासून ३०० किलोमीटर अंतरावर असणारं हे स्थान ट्रेकर्सना आकर्षित करतं. या ठिकाणचं सौंदर्य तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. ✻ केरळमधलं चेंब्रा हे शिखरही ट्रेकिंगसाठी उत्तम आहे. या ट्रेकची सुरूवात चहाच्या मळ्यांमधून होते. आजूबाजूचा हिरवागार निसर्ग मन मोहवून टाकतो. ✻ मुंबईच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातही छोट्या छोट्या ट्रेल्स आणि ट्रेक्सचं आयोजन केलं जातं.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## अर्ज़ किया है...

**शोर दिन को नहीं सोने देता**
**शब को सन्नाटा जगा देता है**
**- सैफुद्दीन सैफ**

**शब- रात्र; सन्नाटा - शांतता**

सध्याच्या धावपळीच्या आयुष्यात प्रत्येकजण दिवसभर व्यस्त असतो. पाठोपाठ कामामुळे दिवसभर गर्दीमध्ये इतका व्यस्त असतो की क्षणभर देखील उसंत घ्यायला वेळ मिळत नाही. परंतु रात्रीच्या एकांतात वैयक्तिक जबाबदारीची आठवण होते आणि मग झोप उडते. अनेकांच्या बाबतीत हे सध्या घडत आहे, विशेष करून मोठ्या शहरांमध्ये आणि खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये. त्यासाठी गरज आहे ती जीवनशैलीमध्ये बदल करून स्वतःची आणि कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेण्याची, कुटुंबा सोबत काही वेळ घालवण्याची.


# समाचार

सोमवार, दि. २४ मार्च २०२५ पान ३


### नगर-नाशिकचा पाण्याचा वाद मिटवणार - विखे

# सत्कार सोहळ्यात मंत्रीपदाची चर्चा अन् राजकीय टोलेबाजी

**समाचार/नगर-दि.२४**

जिल्ह्यातील तीन एमआयडीसी मंजूर झाल्या असून औद्योगिक वातावरण निर्माण करायचे आहे. किमान जिल्ह्यातील दहा हजार भूमिपूत्रांना रोजगार निर्माण होईल. लवकरच उद्योजकांची बैठक घेऊन एमआयडीसीमधील खंडणीबहाद्दरांचा बंदोबस्त केला जाईल. नगर-नाशिक-मराठवाड्याचा पाण्याचा वाद मिटवून गोदावरी खोऱ्यात ६५ टीएमसी पाणी आणणार आहे, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



नगर तालुका भाजपाच्या वतीने रविवारी पालकमंत्री, विधान परिषदेचे सभापती व महायुतीचे नवनिर्वाचित आमारांचा सत्कार सोहळा शहरातील सहकार सभागृहात आयोजत केला होता. यावेळी विखे पाटील बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, आमदार शिवाजी कर्डिले, संग्राम जगताप, मोनिका राजळे, काशिनाथ दाते, विठ्ठलराव लंघे, विक्रम पाचपुते, आमेल खतात्र, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, भाजपचे युवा नेते अक्षय कर्डिले, बाबूशेठ टायरवाले, नितीन दिनकर, अभय आगरकर, अनिल शिंदे, विनायक देशमुख, अशोक सावंत, सुनील साळवे, शहाजीराजे भोसले आदी उपस्थित होते.

यावेळी सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, काही लोक म्हणाले मला प्रोटोकॉल कळत नाही. मी अडीच वर्ष प्रोटोकॉल मंत्री होतो. सभागृहाचा अध्यक्ष पक्षाच्या कामकाजात भाग घेऊ शकतो हे निवडणूक आयोगाने सांगितले.

बाहेरच्या जिल्ह्यातून येऊन त्यांनी नाद केला म्हणून मी नाद केला. साठ वर्षाची त्यांची परंपरा आहे. चार वेळा मुख्यमंत्री, पाच वेळा उपमुख्यमंत्री. केंद्रात मंत्री, विरोधी पक्षेनते अशी पदे भोगली. त्यांची आणि माझी तुलना केली तर त्यांची इज्ञत ६२२ मतांनी जास्त आहे, अशी टीका सभापती शिं यांनी पवार परिवारावर केली.

आमदार कर्डिले म्हणाले, महायुतीचे सरकार आल्यावर अनेकांना वाटले की ज्येष्ठ आमदार म्हणून कर्डिलेंना मंत्रिपद मिळेल. लाडक्या बहिणींमुळे मोनिकाताईंना वाटले आपल्याला संधी मिळेल. परंतु आम्हाला मंत्रिपद संधी मिळाले नाही तरी चालेल. फक्त मतदारसंघात निधी द्या. मंत्री व्हावे अशी माझी अपेक्षा नाही. जर तुमच्या मनात काही आले तर अडीच वर्षाचा कार्यक्रम ठरलाय. विखे पाटील फक्त तुमचा खांदा पलटू नका, दक्षिण- उत्तर एकएक करा. आमच्यात एखाद्याला मिळाले नाही तर कोणी नाराज होणार नाही.

महिला म्हणून मोनिकाताईंनाच संधी मिळेल, असे वाटते आहे. याबाबत मोनिकाताई कधी कोणाला काही सांगणार नाही. थेट मंत्री होऊन आल्यावरच आपल्याला समजेल, अशी टोलेबाजी कर्डिले यांनी केली.

## पान १ वरुन

### नगरमध्ये १३ एप्रिलला महा जनआक्रोश मोर्चा

चर्चेत मोर्चाच्या नियोजनासाठी प्रमुख समिती स्थापन करण्यात आली. याखेरीज नियोजनासाठी विविध समित्याही स्थापन करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पातळीवर घोंगडी बैठका घेऊन मोर्चाच्या नियोजनाची माहिती दिली जाणार आहे. १३ एप्रिलला नगर शहरातून मोर्चा काढून जाहीर सभेने या मोर्चाची सांगता होईल. या बैठकीत बोलताना माजी कुलगुरू सर्जेराव निमसे म्हणाले की, संतोष देशमुख आणि सोमनाथ सुर्यवंशी यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी न्याय मिळण्यासाठी जनतेचा दबाव निर्माण होणे गरजेचे असून त्यासाठी महाजनआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे. कोपर्डी आंदोलनप्रमाणेच हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन संजीव भोर यांनी केले. या बैठकीस अनिल शिंदे, दिलीप सातपुते, निलेश म्हसे, डॉ. दिलीप पवार, अविनाश मोरे, राजू शेटे, भरत मोरे, टिळक भोस, वैभव लोळगे, ज्ञानदेव पांडुळे, गणेश निमसे, उद्धव माने, लाला शेख, देवेंद्र लांबे, बाबा भांड, सुनील साळुंखे, सोमनाथ शिंदे, पांडुरंग पवार, मुकुंद भोर, विनय भगत, नितीन पठारे, अनिल शेटे, प्रकाश निपुंगे, संदीप काटे, ॲड. अनुराधा येवले, स्वाती जाधव आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुकुंदनगरमध्ये ७०० किलो गोमांस पकडले

(रा. नालबंद खुंट ) यांचे असल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातून १ लाख ४१ हजार ५०० रुपये किमतीचे सातशे किलो गोमांस, लोखंडी सत्तूर, चाकू, तराजू असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांच्याविरुद्ध भिंगार काम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे ,पोलीस अंमलदार अजय गव्हाणे, पांडुरंग बारगजे, दिलीप झरेकर, इसराइल पठाण, समीर शेख, प्रमोद लहारे यांनी केली.



### मनसेच्या बैठकीत

# गुढीपाडवा मेळाव्याचे नियोजन

**समाचार/नगर-दि.२४**

दरवर्षी गुढीपाडव्यानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर पाडवा मेळावा होतो. यंदाही हा गुढीपाडवा मेळावा आयोजित करण्यात आला असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे या मेळाव्याच्या माध्यमातून सर्व मनसैनिकांना संबोधित करणार आहेत. जिल्ह्यातील मनसेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना निमंत्रित करण्यासाठी राज ठाकरे यांच्या आदेशाने मी आलो आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्ते चांगले कार्य करत असून पक्ष वाढीसाठी मोठे योगदान देत आहेत. तरी गुढीपाडवा मेळवा हा मनसेसाठी महत्वाचा असून कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मनसे नेते बाबू वागस्कर यांनी केले.

गुढीपाडवा मेळाव्याच्या नियोजनासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत मनसे नेते बाबू वागस्कर, मनसे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, महिला अध्यक्ष ॲड. अनिता दिघे, शहर सचिव डॉ संतोष साळवे, सुमित वर्मा, संकेत व्यवहारे, प्रंशात जाधव, अरुण चव्हाण, डॉ संजय नवथर, दिंगबर पवार, सचिन सटाले, सागर माने, प्रतिक विधाते, प्रमोद ठाकुर, प्रकाश गायकवाड, किरण रोकडे, दादा देशमुख, संदिप चौधरी आदी उपस्थित होते.

मनसे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर म्हणाले की, पक्षातील कार्यकर्त्यांना निमंत्रित करण्यासाठी मनसे नेते बाबू वागस्कर हे बैकीत उपस्थित होते. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाच वातावरण तयार करण्यासाठी या बैठकीचे आयोजिन करण्यात आले. गुढीपाठवा मेळाव्यासाठी जिल्ह्यातील मनसे कार्यकर्ते हजारोच्या संख्यने जाणार असून त्याचे नियोजन या बैठकीत करण्यात आले आहे. या गुढीपाडवा मेळव्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने मनसे कार्यकर्ते जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पदाधिकार्यां ना व कार्यकर्त्यांना मेळाव्या बाबतच्या महत्वाच्या सुचना देण्यात आल्या. तसेच शहरातील मनसेच्या कार्याची माहिती देण्यात आली.



# कोहिनूर आर्ट गॅलरीमुळे कलाकारांना उर्मी - विटणकर

**समाचार/नगर-दि.२४**

कलाकाराला प्रोत्साहन दिल्यास त्यांची कला अधिक बहरत जाते. याच भावनेन कोहिनूर मॉल मध्ये कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कलाविष्कार आर्ट गॅलरी सुरु करून गांधी परिवाराने उत्कृष्ट काम केले आहे. कोहिनूरच्या कलाविष्कार गॅलरी कलाकारांमध्ये नवी उर्मी निर्माण करत आहे, अशा शब्दात ज्येष्ठ चित्रकार वसंत वीटणकर यांनी कोहिनूरच्या कलाविष्कार आर्ट गॅलरी उपक्रमाचे कौतुक केले.

अहिल्यानगरच्या सावेडी येथील कोहिनूर मॉल मधील खास कलाकारांसाठी सुरु करण्यात आलेल्या कलाविष्कार' आर्ट गॅलरीत पुण्याचे प्रसिद्ध चित्रकार रामकृष्ण कांबळे यांच्या गाजलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन वसंत वीटणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रसिद्ध शिल्पचित्रकार प्रमोद कांबळे, कोहिनूरचे मॉलचे संचालक अश्विन गांधी व श्वेता गांधी, यशवंत आंबेकर आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी ३० मार्च पर्यंत खुले आहे.

रामकृष्ण कांबळे म्हणाले, माझ्या चित्रांचे जहांगीर आर्ट गॅलरी, राजा वर्मा आर्ट गॅलरी मध्येही माझ्या चित्रांचे प्रदर्शन झाले. पण माझ्या जन्मभूमीत नगरमधील कोहिनूर आर्ट गॅलरीत झालेले हे प्रदर्शन आनंदायी आहे. कलाकारासाठी एखादी रचना निर्माण करणे सोपे नसते. रक्त आटवून तो ही कला साकारतो. एखादे मुल जन्माला यावे तशी कलाकृती जन्माला येत असते. त्यामुळे चीत समजण्यासाठी जास्तीत जास्त चित्र पहात रहा.

कोहिनूरच्या संचालिका श्वेता गांधी म्हणाल्या, कोहिनूर मधील कलाविष्कार आर्ट गॅलरी ही कलाकारांना त्यांची कला नागरिकांपर्यंत पोचवण्यासाठीच निर्माण करण्यात आली आहे. कलाकार्नाच्या या हक्काच्या व्यासपीठाचा कलाकारांनी लाभ घ्यावा. सर्व नागरिकांनी या चित्र प्रदर्शनाला भेट घ्यावी, असे आवाहन केले. यशवंत आंबेकर यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले तर दीप्ती गुंदेचा यांनी आभार मानले.

### जागतिक क्षयरोग दिनानिमित्त

# महापालिकेची शहरात जनजागृती रॅली

**समाचार/नगर-दि.२४**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरात क्षयरोग मुक्त भारत अभियान राबवण्यात आले. या निमित्ताने महापालिकेच्या वतीने ७ डिसेंबर ते १७ मार्च या कालावधीत सुमारे दोनशेहून अधिक शिबिरे घेण्यात आली. यात शहरामध्ये २१० रुग्ण आढळले असून त्यांच्यावर मोफत उपचार सुरू करण्यात आले आहेत. क्षयरोग मुक्त नगरसाठी लक्षणे असलेले रुग्ण वेळीच शोधून त्यांच्यावर उपचार करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. त्यासाठी हे जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे. या उपक्रमात महापालिका राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

जागतिक क्षय रोग दिनानिमित्त शहरातून प्रभात फेरी काढण्यात आली. यात महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह आशा सेविकांनी सहभाग घेतला. तसेच, प्रयत्न नर्सिंग होम, बूथ हॉस्पिटल, आनंदऋषीजी नर्सिंग कॉलेज असे चार नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यात सहभागी




झाले होते. आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते या रॅलीचे उदघाटन करण्यात आले. जुनी महापालिका, आशा टॉकीज, माणिक चौक, भिंगारवाला चौक, तेलीखुंट, डाळमंडई, पारशाखुंट, बूथ हॉस्पिटलपर्यंत ही रॅली काढण्यात आली. यातून क्षय रोगाच्या लक्षणांबाबत जनजागृती करण्यात आली.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून १०० दिवसाचे अभियान राबविण्यात आले. यात सुमारे २०० शिबिरे ७ डिसेंबर ते १७ मार्च या कालावधीत घेण्यात आले. त्यात २१० रुग्ण आढळले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तपासण्या, उपचार पूर्णपणे मोफत आहेत. नवीपेठ येथे महापालिकेचा क्षयरोग विभाग असून तेथे सर्व अत्याधुनिक तपासण्या मोफत करण्यात येत आहेत. क्षय रोगाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती आवश्यक आहे. त्यातून वेळीच रुग्ण शोधून त्यांच्यावर योग्य उपचार करता येतात. या उपक्रमात आरोग्य विभागाने चांगली मेहनत घेऊन काम केले आहे. त्यामुळेच महापालिकेला राज्यात पहिल्या तीन क्रमांकात स्थान मिळाले आहे. नागरिकांनीही लक्षणे आढळल्यास तत्काळ महापालिकेच्या नवीपेठ येथील क्षयरोग विभागात संपर्क साधून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डांगे यांनी केले आहे.दरम्यान, क्षयरोग जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धा तसेच, पोस्टर व रिल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. क्षयरोग जनजागृतीपर या स्पर्धा मंगळवार दि. २५ मार्च रोजी घेण्यात येणार असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी सांगितले.

# आनंदधाम भक्त निवास येथे २८ मार्चला रक्तदान शिबीर

**समाचार/नगर-दि.२४**

आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त मानव सेवा केंद्र, धार्मिक परीक्षा बोर्ड आयोजित व अहमदनगर मर्चंटस् को.ऑप.बँक प्रायोजित भव्य रक्तदान शिबीर शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ रोजी भक्त निवास, आनंदधाम येथे सकाळी ९ ते ५ यावेळेत होणार आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक (नगर व पुणे), जन कल्याण रक्तपेढी, बाळासाहेब देशपांडे रकतपेढी, सिव्हील हॉस्पिटल यांची टिम रक्त संकलनाचे काम पाहणार आहे. शिबिराचे उद्घाटन सकाळी ९ वाजता मर्चंटस् बँकेचे चेअरमन तथा जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षपद धार्मिक परीक्षा बोर्डचे



अध्यक्ष नेमीचंद चोपडा (पाली, राजस्थान) भूषविणार आहेत. यावेळी माजी आ.अरूण जगताप, आ.संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, मनपा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश राजूरकर, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, मीनाताई संजय चोपडा, शितलताई जगताप, मर्चंटस् बँकेचे व्हा. चेअरमन अमित मुथा व बँकेचे सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत. गुरुदेवांप्रती श्रध्दांजली अर्पण करताना रक्तदानाचे पवित्र कार्य करण्याची अनमोल संधी यानिमित्ताने भाविकांना मिळत असते. तीन दशकांच्या रक्तदान महायज्ञात आतापर्यंत सुमारे ३१ हजार रक्त पिशव्यांचे संकलन झाले आहे. यात महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग असतो. महिलांसाठी शिबिराच्या आधी दोन महिन्यांपूर्वी मोफत हिमोग्लोबीन तपासणी शिबिर घेवून त्यांना उपचार मार्गदर्शन केले जाते. यावर्षीही भाविकांनी उदंड प्रतिसाद देत रक्तदानाचा नवीन विक्रम स्थापित करावा, असे आवाहन धार्मिक परीक्षा बोर्डचे सचिव संतोष बोथरा, मानवसेवा केंद्राचे संयोजक डॉ. विजय भंडारी, धार्मिक परीक्षा बोर्डचे सह मानद मंत्री सागर गांधी व मर्चंटस् बँकेच्यावतीने करण्यात आले आहे.

### जैन महामंडळाच्या अध्यक्षांचे शहरात स्वागत

# जैन युवक, व्यापारी, उद्योजकांसाठी लवकरच मेळावा-गांधी

**समाचार/नगर-दि.२४**

जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळाचे राज्य मंत्र्यांचा दर्जा असलेले अध्यक्ष ललित गांधी अहिल्यानगर मध्ये आले होते. नगरच्या रेल्वे स्थानकावर त्यांचे सकाळ जैन समाजाच्या वतीने करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या जैन प्रकोष्ठ चे प्रदेश सचिव आणि मध्य रेल्वे मुबईच्या सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल त्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सकल राजस्थानी युवा मंच ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष धनेश कोठारी , बडीसाजन ओसवाल युवक संघाचे अध्यक्ष



रुपेश पारख, सकल राजस्थानी युवा मंच ट्रस्टचे अध्यक्ष संदेश मुनोत, राहुल मुथा आदी उपस्थित होते.

ललित गांधी हे आजपासून अहिल्यानगर , नाशिक अकोला, अमरावती, नागपूर अशा दौऱ्यावर असून त्यांनी सुरुवात अहिल्यानगर पासून केली. रेल्वेस्टेशन येथील जैन मंदिराला भेट देऊन त्यांनी भगवान महावीरांची दर्शन घेतले, त्यानंतर ते राहुरीकडे रवाना झाले राहुरी इथे अहिल्यानगर जिल्हा व्यापारी अधिवेशनाला ते प्रमुख पाहुणे म्हणून त्यांची उपस्थिती होती.

गांधी म्हणाले की, समाजाच्या सर्वसमावेशक उन्नतीसाठी आपण प्रयत्नरत आहोत. जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक मंडळाच्या माध्यमातून समाजातील युवा वर्गाला, होतकरू युवक युवती उद्योजक आणि व्यावसायिकांना त्याचा लाभ व्हावा असा आपला प्रयत्न राहील. तसेच त्यासाठी समाजातील युवकांनी एकत्र येऊन युवा मंचाच्या माध्यमातून समाजाची वज्र मूठ बांधावी. असे आवाहन त्यांनी केले. अहिल्यानगर शहर आणि जिल्ह्यातील जैन बांधवांचा मेळावा या महिन्यात घेण्याचे नियोजन सुरु आहे. जैन समाजाच्या धार्मिक अधिकारांची सुरक्षा , जैन साधू संत साध्वी आजन्म कोणत्याही वाहनात बसत नाहीत. पायी प्रवास करतात. त्यांच्या प्रवासात त्यांची सुरक्षा, धार्मिक पाठशाळा, समाज मंदिरे, तीर्थक्षेत्रे यांचे आधुनिकीकरण व्हावे यासाठी समाजातील युवक युवती पुढे येऊन एकजुटीने काम करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## भ. महावीर व्याख्यानमाला २०२५

वार - सोमवार, दि. २४ मार्च सायं. ७ वा
वक्ता - प्रा. नितीन लाठे
विषय- आयुष्याचे गणित
स्थळ - आनंदधाम, अहिल्यानगर



## हनुमान चालिसा



### मंगल भक्त सेवा मंडळ

सोमवार, दि. २४/०३/२०२५
अरुण काका जगताप मित्र मंडळ
संग्राम जगताप यांचे कार्यलय, स्टेशन रोड

### श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)

सोमवार, दि. २४/०३/२०२५
सातभाई गल्ली गणेश मित्र मंडळ, दीक्षित मंगल कार्यालय

### दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ

सोमवार, दि. २४/०३/२०२५
स्वामी विवेकानंद मित्र मंडळ
स्वामी विवेकानंद चौक, शनिगल्ली.


**समाचार**
**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**रुपया वधारला**
**सेन्सेक्स १००० ने निफ्टी ३०० ने वाढ**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २४-०१-२०२५**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७७९३० |
| एसीसी | १९३६-३७ |
| एशियन पेंट | २३१५-१६ |
| बजाज ऑटो लि. | ८१७०-७१ |
| बलराम फूड चिनी | ५३३-३५४ |
| भारत फोर्ज | ११९९-१२०० |
| क्रॉम्प्टन | ३६२-६३ |
| डीएलएफ | ७१२-१३ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२०१-०२ |
| ग्रॅफाईट इंडिया | ४६२-६३ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२४९-५० |
| आयटीसी लि. | ४११-१२ |
| एल ॲण्ड टी लि. | ३४८०-८१ |
| रिलायन्स इंड. | १३०१-०२ |
| एसबीआय | ५७६-७७ |
| टाटा मोटर्स | ७१५-१६ |
| टाटा स्टील | १५८-५९ |
| टीसीएस | ३६३६-३७ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १८८-८९ |
| सुवेन फार्मा | ११७५-७६ |

# किरण काळेंची निवड पुनर्वैभव देणारी : ठोंबरे

**समाचार/नगर-दि.२४**

किरण काळे यांच्या रुपाने एक संयमी व अभ्यासू व्यक्तीमत्व शहरातील राजकारणात योगदान देत आहे. त्यांचे राजकारण फक्त सत्ता व खुर्चीसाठी नसून, लोकांच्या जीवनात आणि शहरात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या प्रश्नातवर त्यांनी सकारात्मक बदलाचा विडा उचलला आहे. शहरात शिवसेना ठाकरे पक्षाला पुनर्वैभव प्राप्त करुन देण्यासाठी त्यांची शहर



प्रमुख म्हणून झालेली निवड युवकांना दिशा देण्याचे कार्य करणार असल्याची भावना महाराष्ट्र राज्य वायरलेस संघटनेचे अध्यक्ष सर्जेराव ठोंबरे यांनी व्यक्त केली.

किरण काळे यांची अहिल्यानगर शिवसेनेच्या (उ.बा.ठा.) शहर प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ठोंबरे बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी भाऊसाहेब शिंदे, जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब काळे आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना किरण काळे म्हणाले की, मी शहरातील सर्व जुन्या-नवीन शिवसैनिकांची मोट बांधण्याचे काम करीत आहे. राजकारणापेक्षा समाजकारणाला माझा अधिक प्राधान्य आहे. स्व.अनिल राठोड यांचा खरा हिंदूत्वाचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम शहर शिवसेना करत आहे. शहरातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी, तसेच सेवेतील कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांमच्या सोडवणुकीसाठी माझा कायम प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कैलास खणकर यांना उत्कृष्ट मराठी अध्यापक पुरस्कार




**समाचार/नगर-दि.२४**

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल (वाळकी) येथील मराठी विषयाचे अध्यापक कैलास तुकाराम खणकर यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान (ता. श्रीरामपूर) यांच्याकडून प्रदान करण्यात आला.

पुरस्काराचे वितरण कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या मानसकन्या सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका रेखाताई भांडारे यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत, उपाध्यक्ष संदीप पठारे, कार्याध्यक्ष सागर पवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाळासाहेब बोठे, स्थानिक कुल कमिटीचे अध्यक्ष विक्रम बोठे तसेच स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब साळुंके, पर्यवेक्षक दत्तात्रय लांडे यांनी अभिनंदन केले.

### जनमित्र सेवा संघाचा अभिनव उपक्रम

# पंचगव्य ओझोन आधारित आरोग्य नवरात्र

**समाचार/पुणे-दि.२४**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळिराम हेडगेवार यांच्या जन्मदिनानिमित्त पंचगव्य आणि ओझोन चिकित्सा असा 'आरोग्य नवरात्र' उपक्रम जनमित्र सेवा संघाचे चिटणीस डॉ.दिलीप कुलकर्णी यांनी १ ते १० एप्रिल २०२५ पर्यंत आयोजित केला आहे.

देशी गाईचे दूध आणि त्या दुधापासून होणारे दही, तूप तसेच गाईचे गोमूत्र, गोमय असे पंचगव्य म्हणून ओळखले जाणारे पाच पदार्थ आणि ओझोन हे वैज्ञानिक संशोधन या दोन्हींची एकत्रित चिकित्सा म्हणजे पंचगव्य आधारित ओझोन चिकित्सा. या चिकित्सेचा उपयोग कॅन्सर तसेच कोणत्याही दीर्घकालीन दुर्धर आजारांवर देखील अत्यंत प्रभावी पद्धतीने, सकारात्मक रिझल्ट देणारा होतो. या उद्देशाने जनमित्र सेवा संघाने पंचगव्य ओझोन आधारित 'आरोग्य नवरात्र' उपक्रमात नऊ दिवस रोज एक वेगळा आजार आणि त्यावरचे शक्य तितके मोफत औषधोपचार करण्याचे ठरविले आहे. या आरोग्य नवरात्रात १) कॅन्सर (सर्व प्रकारचे), २) गुडघेदुखी, अन्य सांधेदुखी, ३) पित्त वृद्धी, (हायपर सिडिटी), ४) मधुमेह, किडनीचे आजार, ५) रक्तदाब ६) हृदयाचे ब्लॉकेजेस/धमणी अवरोध, ट्रायग्लिसराईड्स, कोलेस्टेरॉल, ७) चेहऱ्यावरील पिग्मेंटेशन वर तसेच चेहरा आकर्षक दिसावा यासाठी उपयुक्त चिकित्सा, ८) दमा, फुफ्फुसाचे आजार, ९) मानसिक ताण-तणाव, निद्रानाश व त्यापासून होणारे आजार या सर्वावर या चिकित्सेद्वारे उपचार करण्यात येतील.

या उपचारांसाठी सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या वेळात नोंदणी चालू आहे. त्यासाठी ९४२३० ३६९६५, ९०११६ ९६९६५ या नंबरवर संपर्क करावा.




# जनसुरक्षा विरोधात पुण्यात निदर्शने

**समाचार/पुणे-दि.२४**

राज्य सरकारच्या जनसुरक्षा विधेयकाविरोधात पुण्यातील विविध संघटना आणि राजकीय पक्ष एकवटले असून रविवारी लोकमान्य टिळक चौकात निदर्शने करण्यात आली.

मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी पुण्यात होते. त्यांच्या दौऱ्या दरम्यानच ही निदर्शने करण्यात आली. निदर्शने करणाऱ्यांमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेना (उबाठा), रिपब्लिकन पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, लाल निशाण पक्ष, क्रांतीकारी कामगार पक्ष हे राजकीय पक्ष तसेच सुराज्य संघर्ष समिती, अंगमेहनती संघर्ष समिती, जबाब दो आंदोलन, सिटू अशा संघटना सामील झाल्या होत्या.

आगामी काळात जनसुरक्षा विधेयकाविरोधात आंदोलन शांततामय मार्गाने पण, तीव्र केले जाईल, असा इशारा कम्युनिस्ट नेते अजित अभ्यंकर यांनी निदर्शकांसमोर बोलताना दिला. कोणतेही आंदोलन बेकायदा ठरविण्याचा अधिकार जनसुरक्षा विधेयकाद्वारे राज्य सरकारला मिळणार आहे. सरकारच्या हाती अमर्याद अधिकार जाणे, ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे, अशी भीती निदर्शकांसमोर बोलताना वक्त्यांनी व्यक्त केली.

# नगरमध्ये १३ एप्रिल रोजी माळी वधू-वर मेळावा

**समाचार/नगर-दि.२४**

विवाह संस्था टिकवून राहणे, शेतकरी कुटुंबातील मुलांचे विवाह जमविणे, फक्त शासकीय नोकरीतील मुलगा पाहिजे असा अट्टाहास सोडून उद्योग व्यवसायात काम करणारे, स्वयंरोजगार करणाऱ्या युवकांनाही वधू पित्याने व वधूने पसंती प्राधान्य क्रमाने विवाह केले जावे, यासाठी विशेष व्याख्यानासह माळी वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात वधू-वर मेळावा होणार आहे. या मेळाव्यात इच्छुक वधू-वर पालकांसह समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन ड. महेश शिंदे, पोपटराव बनकर, गणेश बनकर, स्वाती डोमकावळे



यांनी केले आहे.

वधूसाठी कायमस्वरूपी मोफत नोंदणी केली जाणार आहे. ५ एप्रिल पर्यंत आपले बायोडाटा, तीन प्रतीत फोटो, आधार कार्डसह ड. महेश शिंदे, पावन गणपती मंदिरा शेजारी, जुन्या कोर्टामागे टांगे गल्ली येथे नाव नोंदणी करावी, तर उशीरा आलेले बायोडाटा स्वीकारले जाणार नसल्याचे म्हंटले आहे. अधिक माहितीसाठी ९००४%२२३३० व ९९२१८१००९६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# चंदुकाका ज्वेल्स् सावेडी येथे सोनेरी फायदा योजना

**समाचार/नगर-दि.२४**

सण म्हणजे उत्सव व या उत्सवात केलेली सुवर्णखरेदी भाग्याची आणि समृध्दीची समजली जाते आणि म्हणुनच भारतात दसरा, दिवाळी, पाडवा, गुरूपुष्य प्रमाणेच चैत्र गुढी पाडव्याला देखील सुवर्णखरेदीला विशेष महत्व आहे. या दिवसाची खरेदी भाग्याची, सौख्य समाधान देणारी असते.

खास गुढीपाडव्यानिमित्त सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्स सुवर्णग्राहकांसाठी घेवून आले आहेत गुढीपाडवा सोनेरी फायदा योजना.. या योजने अंतर्गत आपणांस भरपुर फायदा मिळणार आहे. एकतर आपण फक्त १० टक्के रक्कम भरून आपले सोने बुक करू शकतात. त्यानंतर बाजारात कितीही चढ उतार आले तरी त्याची तुम्हांला काहीही टेन्शन घेण्याची गरज राहिलेली नाही. कारण तुम्ही ज्या दिवशी सुवर्णखरेदी कराल त्या दिवशीचा सोन्याचा दर व बुकिंग केलेल्या दिवशीचा सोन्याचा दर यापैंकी जो दर कमी असेल त्या दरात आपण सोने खरेदी करू शकतात. शिवाय याहुनही अधिक म्हणजे तुम्ही खरेदी करत असलेल्या सोन्यावर तुम्हाला प्रतीग्रॅम ३३ रूपये सूट मिळणार आहे. म्हणजे सुवर्णग्राहकांचा फक्त फायदाच नाही तर दुप्पट फायदा..

सदर योजना ही २२ कॅरेट दागिन्यांवर लागू आहे. योजना १४ मार्च २०२५ ते ३० मार्च २०२५ पर्यंतच चालु असल्याने अधिकाधिक सुवर्णग्राहकांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे. चंदुकाका ज्वेल्स ने खास आपल्या सुवर्ण ग्राहकांसाठी भविष्यातील फायद्याच्या सोने खरेदीसाठी सुवर्णसमृध्दी योजना आणली आहे. यामध्ये आपण आजच सहभागी होवून १० मासिक हप्ते भरा व योजना पुर्ण झाल्यावर दागिने खरेदी करतांना भरघोस फायद्यासह मजुरीवर देखील भरघोस सुट मिळवू शकतात. चंदुकाका ज्वेल्सने नुकतीचे लॉंच केलेली लकी गोल्ड योजना ग्राहकांच्या पसंतीस उतरलेली आहे. या योजने अंतर्गत ११ हप्ते भरा व सोने खरेदी करतांना मजुरीमध्ये १००% सूट मिळवा. म्हणजेच सोने खरेदी करतांना आपणांस फक्त सोन्याचे मुल्य द्यावयाचे आहे. मजुरी लागणार नाही.

खास सुवर्णग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरी मध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची भव्य श्रुंखला.. आपणांस हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे.चांदीमधील फॅशन ज्वेलरी फॉर्मिंगमधील (१ग्रॅम सोन्यामधील) फॅशन ज्वेलरी, चांदी व सोन्या मधील आकर्षक फ्रेमही उपलब्ध. चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही हे चंदुकाका ज्वेल्स्चे विशेष वैशिष्टये. या विविध योजनांमुळे ग्राहकांना अधिकाधिक फायदा मिळणार आहे. तरी आमच्या सर्व ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे

## विषारी औषध प्राशन केल्याने तरूणाचा मृत्यू

**समाचार/नगर-दि.२४**

शेंडी (ता. नगर) येथील एका तरूणाने विषारी औषध प्राशन केल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. किरण रमेश देठे (वय ४०, रा. शेंडी) असे त्याचे नाव आहे. १३ मार्च रोजी किरण देठे यांनी विषारी पदार्थ सेवन केला होता. प्रकृती बिघडल्याने त्यांना तत्काळ जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, २२ मार्च रोजी दुपारी १२ वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले. या प्रकरणाची माहिती पोलीस अंमलदार गायकवाड यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यास कळवली. यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस अंमलदार साबीर शेख अधिक तपास करत आहेत.

### भगवान महावीर व्याख्यानमाला; पुष्प दुसरे

# मोबाईलमुळे भावी पिढी विकलांग होण्याचा धोका : गिरी

**समाचार/नगर-दि.२४**

आज इयत्ता पहिली-दुसरीमधील मुले मोबाईल वापरतात ही अभिमानाची वा कौतुकाची बाब नाही तर मोबाईलमुळे आपली भावी पिढी विकलांग होणार, हे वास्तव ध्यानी घेऊन गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन युवा वक्ते राहुल गिरी (बीड) यांनी केले. राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री. आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प भविष्यावर बोलू काही या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते.

व्याख्यानमालेचे मुख्य प्रायोजक जयकुंवरबाई मोतीलालजी लोढा यांच्या स्मरणार्थ मनिषा लोढा आणि लोढा परिवार आहेत. सरोजताई कटारिया यांनी सूत्रसंचालन केले. गिरी म्हणाले, मोबाईलचा वापर केवळ अभ्यासाकरिता करणारी मुलं डॉक्टर, उच्चपदस्थ अधिकारी होवू शकतात मात्र तासन् तास मोबाईलवर टाइपपास करणारी मुलं आपलं भविष्य अंधःकारमय करत



आहेत. मोबाईलमुळे भावनिकता संपत चालली आहे. पूर्वी न बोलता संवाद व्हायचे आता बोलण्यासाठी हाती मोबाईल असूनही संवाद हरवत चालले. मोबाईलला अभिमान वाटेल अशी पिढी निर्माण होणे गरजेचे आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये सुयश मिळवण्यासाठीमोबाईलचाअवश्य वापर करावा. आत्महत्या कशी करावी? हे पाहू नये. फेसबुकला मिळालेल्या लाईक्सवर आपल्या आयुष्याचे मोजमाप करायचे नसते. व्हॉटसअपच्या स्टेटस् ने आपले स्टेटस् वाढत नाही. आई-वडिलांची मान उंचावेल, असे स्वतःचे स्टेटस् निर्माण करावे. उद्याच्या पिढीचे भविष्य घडवण्यासाठी सकारात्मक विचार महत्त्वाचा ठरेल.

ज्ञानेश्वरांसारखं वयाच्या १८व्या वर्षी कर्तृत्व सिध्द करण्याचं कळलं तर आपल्या पिढीचं भविष्य योग्य मार्गाने जातयं, असे समजावे. मुलांसाठी महागडे मोबाईल खरेदी करताना भगवान महावीर आणि २४ तीर्थंकरांचे जीवन चरित्र अवश्य खरेदी करून मुलांच्या हाती देत या चरित्राच्या वाचण्यामधून जीवन समजून घेण्याचा प्रयत्न कर, असे अवश्य सांगा. तीर्थकरांनी आपलं जीवन विश्व कल्याणासाठीच घालवलं.क्रांतीकारक भगतसिंग, भगवान महावीर, छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, स्वामी विवेकानंद असे महापुरूष भारतातच जन्म घेतात, हे जगाने पाहिले आहे म्हणून आजही जग भारताकडे आशेने पहाते आहे. विज्ञानाने भरपूर प्रगती केली पण माणसातला माणूस जीवंत राहिला का? याचे चिंतन करण्याची वेळ आली आहे. डॉक्टरांनी प्रामाणिकपणे रूग्णसेवा, शिक्षकांनी प्रामाणिकपणे ज्ञानदानाची सेवा अशी प्रत्येकाने प्रामाणिकपणे सेवा केल्यास ती देशसेवाच घडेल, असे गिरी यांनी सांगितले.

### कॅन्सर तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

# आचार्य आनंदऋषीजी यांचे वरदान लाभल्याने हजारो रुग्णांची सेवा घडते : निलेश मुथा

**समाचार/नगर-दि.२४**

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्णांची सेवा केली जाते. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा घडावी.हे आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे स्वप्न होते.गोरगरीब आणि गरजू रुग्णांची तपासणी करुन सवलतीच्या दरात यशस्वीपणे शस्त्रक्रिया करून हजारो रुग्णांना दिलासा दिला जातो.आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल चे सर्व डॉक्टर्स, नर्सेस,स्टाफ व जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अहोरात्र परिश्रम घेत आहेत.असे प्रतिपादन उद्योजक निलेश मुथा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृती दिना निमित्त स्व.सुरजमलजी मुथा,स्व. सुजाताबाई मुथा यांच्या स्मृतिप्रित्यार्थ महावीर फार्मा अहमदनगर,झ्रा हाऊस



अ.नगर व मुथा परिवाराच्या वतीने कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी मनोज मुथा,निलेश मुथा,आयुष मुथा,यश मुथा,तुषार बोगावात,राहुल गुगळे,संध्या मुथा,मंगल चोपडा, महावीर भोजनालय चे मिलापचंद पटवा,अमित पटवा,रवी शेलोत,साक्षी मुथा,संदेश कटारिया,हर्षद मुथा,मनीष बोरुडे,महेंद्र राऊत आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य डॉ.वसंत कटारिया,मानकचंद कटारिया,अनिल मेहेर,सुभाष मुनोत,डॉ.आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.अनिकेत शिंदे, डॉ.लिला बलसारा,डॉ.गजेंद्र गिरी,डॉ.रविराज गवळी,डॉ.आर.एन.पांडे, डॉ.रवींद्र मुथा,डॉ.मितेश कटारिया, डॉ.भक्ती फालके, डॉ.निखीता कटारिया डॉ.मुकुंद उंडे डॉ.सारिका झरेकर आदी उपस्थित होते. यावेळी साक्षी मुथा यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया यांनी रुग्णालयाच्या कार्याचा आढावा घेत मुथा परिवाराचे योगदान अधोरेखित केले.

डॉ.अनिकेत शिंदे म्हणाले, भारतात कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. कॅन्सरचे समुळ उच्चाटन व्हावे यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल प्रयत्नशील आहे.या शिबिरात घशाचा ,फुफुसाचा,आतड्याचा, तोंडाचा कॅन्सर,मॅमोग्राफी मशिनद्वारे स्त्रियांच्या स्तनाचा कॅन्सर तपासणी, स्त्रियांच्या गर्भपिशवीच्या कॅन्सर व निदानाकरिता सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी. सर्व प्रकारचे कॅन्सर उपचार, ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटीव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटीक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ. सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध आहेत.

या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

डॉ.आशिष भंडारी यांनी स्वागत केले. अनिल मेहेर यांनी आभार मानले.

# समिंद्राबाई गावखरे यांचे निधन

**समाचार/नगर-दि.२४**

चास ता. नगर येथील रहिवाशी समींद्राबाई विठ्ठलराव गावखरे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ५ मुले, १ मुलगी, सून, जावई, नातवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्या जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी कै. विठ्ठलराव गावखरे यांच्या पत्नी तर राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहिल्यानगर येथील प्रा. बाळासाहेब गावखरे यांच्या मातोश्री होत्या.



## 'महिला सशक्तीकरण कार्यक्रम; मोठा प्रतिसाद

# महिलांना मिळाले निरोगी आरोग्याचे धडे

**समाचार/नगर-दि.२४**

अर्हम पुरुषाकार मेडिटेशन, अर्हम गर्भसंस्कार साधना आणि न्यूट्रिशन ब्लीस यांच्यि संयुक्त सहभागाने महीला सशक्तीकरणा या विषयावर प्रेरक कार्यक्रम ड्क्एपशीसू आयोजित करण्यात आला होता, केशर गुलाब मंगल कार्यालयामध्ये झालेल्या या कार्यक्रमांमध्ये दीडशेहून अधिक महिलांनी भाग घेतला होता.




प्रसिद्ध आहारतज्ञ, प्रमाणित योग प्रशिक्षक आणि मेडिटेशन ट्रेनर, कल्याणी चोरबेले यांनी महिला वर्गाला मार्गदर्शन केले.महिलांचे जीवन अनेक टप्प्यांतून जात असते-शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक संघर्षांनी भरलेले. या सेमिनारमध्ये स्त्रीत्वाचा सन्मान, आरोग्य, योग, ध्यान आणि संतुलित आहाराचे महत्त्व, कुटुंबातील मूल्ये आणि जबाबदाऱ्या, तसेच स्वतःची ओळख आणि आत्मनिर्भरता यावर सखोल चर्चा झाली. समाजाच्या चौकटींमध्ये राहून स्वतःसाठी वेळ काढणे, आपली मानसिकता विकसित करणे आणि नवीन पिढीला योग्य मार्गदर्शन देणे किती महत्त्वाचे आहे, हे यातून अधोरेखित केले.

अर्हम विज्या फाउंडेशनचे सर्वेसर्वा उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराजांच्या आवाजातील ध्वनिफीत ही महिलांना स्वनिरीक्षणाच्या प्रक्रियेत मंत्रमुग्ध केले. अहिल्यानगर सेंटर प्रमुख प्रिया बोरा यांनी ध्यानाचे महत्त्व महिलांना पटवून देत सांगितले की, ध्यान म्हणजे मनाची विचारहीन अवस्था आहे जिथे गहन शांतीशिवाय दुसरे काहीही नाही. अर्हम पुरुषाकार मेडिटेशन मध्ये विनाशर्त अतिशय सहजतेने स्वध्यानात पोहोचवले जाते .आजच्या टेक्निकल व डिजिटल युगात साधनांची रेलचेल झाली पण व्यक्ती मानसिक व भावनिक रित्या खचत चाललेला आहे व या चुकीच्या भावनांमुळे शरीरात हार्मोन्स असंतुलित होतात व या असंतुलनाचे परिणाम वेगवेगळ्या आजारात होतात. नेमके याच तत्वावर अर्हम पुरुषाकार मेडिटेशन कार्य करते. सर्वात शेवटी बीज रूपातच संस्कार घडविणारी अर्हम गर्भसंस्कार साधनेच्या ट्रेनर डॉक्टर प्रीती फिरोदिया यांनी या संस्कारांचे महत्त्व पटवीत आलेल्या स्त्री वर्गाला सांगितले की अर्हम गर्भ संस्कार साधना_ मातृत्वाच्या असीम सामर्थ्याला साकार रूप देणारी शास्त्रोक्त पद्धत आहे अर्हम गर्भसंस्कार साधना संस्थेतर्फे माता पितां होण्यासाठी इच्छुक दांपत्यांना गर्भस्थ शिशूच्या आगमनापूर्वी शारीरिक व मानसिक दृष्टीने सुदृढ बनवून एका दिव्य संतती चे स्वागत ते संपूर्ण संगोपन, संरक्षण व सुखरूप प्रसूती व प्रसूती नंतर दोन वर्षांपर्यंत चे प्रभावी पालन पोषण यांचे मार्गदर्शन उपाध्याय प्रवर पूज्य प्रवीण ऋषी यांच्या मार्गदर्शना खाली दिले जाते. डॉ फिरोदिया यांनी उपस्थित महिलांना आवाहन केले की जास्तीत जास्त महिलांनी आपल्या संपर्कामध्ये असलेल्या भावी माता पितांना या वर्गाशी जोडावे व भावी संततीचे भविष्य सुरक्षित करावे.



## सावित्रीबाई फुले नगर प्रवेशव्दाराचे काम पूर्ण

# शहरातील माळी समाजाचे कार्य कौतुकास्पद- आ. जगताप

**समाचार/नगर-दि.२४**

सारसनगर या उपनगराचे सावित्रीबाई फुले नगर नामकरण करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुलेनगरच्या भव्य दिव्य आणि सुंदर प्रवेशद्वाराचे काम पूर्णत्वास आल्याने या उपनगराला वैभव प्राप्त होऊन चांगले देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. शहरातील सकल माळी समाजाचे कार्य कौतुकास्पद आहे. महाराष्ट्राच्या भूमीत होऊन गेलेले महात्मा फुले दांपत्यांनी समाजाला व देशाला दिशा दर्शक असे कार्य केले आहे. आज सावित्रीबाई फुलेनगर नामकरण व प्रवेशद्वारामुळे येणाऱ्या पिढीपर्यंत त्यांच्या कार्याचा व विचाराचा वारसा जाणार आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

सावित्रीबाई फुले नगर परिसराच्या भव्य प्रवेशद्वाराचे काम जगताप परिवाराने स्वखर्चाने पूर्ण केल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सकल माळी सामाजाच्या वतीने रविवारी सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सकल माळी सामाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, प्रा. माणिकराव विधाते, माजी उपमहापौर अनिल बोरूडे, सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे, विनोद पुंड, अर्जुन बोरूडे, ज्ञानेश्वर रासकर, सुरेश आंबेकर, प्रकाश इवळे, अ‍ॅड.राहूल रासकर, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, अमोल भांबरकर, नारायण इवळे, अशोक कानडे, पंडितराव खरपुडे, चंद्रकांत पुंड, अमित खामकर, रेणुका पुंड, रेखा विधाते, कल्याणी गाडळकर, अश्विनी दळवी आदींसह मोठ्या संख्येने माळी समाजातील नागरिक उपस्थित होते. आ. जगताप म्हणाले, शहरात विविध भागांना डागवाले मळा, बोरुडे मळा, आगरकर मळा असे नावे देण्यात आले आहेत. मळे हे ग्रामीण भागात असतात. आता आपले अहिल्यानगर शहर विकसित होत आहे. त्यामुळे आता या भागांचा उल्लेख मळा न करता डागवाले नगर, बोरुडे नगर असा करून या नावांचे फलक त्या त्या भागात लावावेत. तसेच आजपासून सारसनगरचाही उल्लेख सर्वांनी सावित्रीबाई फुलेनगर असाच करावा असे आवाहन आ. जगताप यांनी केले.

प्रास्ताविक किशोर डागवाले यांनी केले. प्रा.माणिक विधाते यांचे भाषण झाले. अशोक कानडे, ज्ञानेश्वर रासकर, अनिल बोरुडे आदींनी आ.संग्राम जगताप यांचे आभार मानत मनोगत व्यक्त केले. यावेळी दिपक खेडकर, डॉ. सुदर्शन गोरे, जालिंदर बोरूडे, अशोक आगरकर, बाळासाहेब गायकवाड, संजय कानडे, सुधाकर कानडे, रामदास कानडे, अभिषेक चिपाडे, मच्छिंद्र बनकर, भानुदास बनकर, भाऊसाहेब कोल्हे, संजय झोडगे, गणेश कोल्हे, आनंद पुंड, राजेंद्र एकाडे, संतोष हजारे, वसंत आगरकर, गजानन ससाणे, रमेश चिपाडे, प्रकाश शिंदे, सुदाम बोरूडे आदींसह सकलमाळी समाजाचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

# 'समर्थ' मधील पाककृती स्पर्धेत वीस पालकांचा सहभाग

**समाचार/नगर-दि.२४**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी प्राथमिक विभाग येथे शनिवार दि. २२ मार्च रोजी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरील योजनेअंतर्गत केंद्रशासनातर्फे सदर वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले असल्याने ह्या विषयाला अनुसरून तृणधान्ये व फोर्टीफाईड तांदळाचे महत्व विषद करणाऱ्या विविध पाककृतींचा समावेश करून मातापालकांनी करून स्पर्धेस प्रतिसाद दिला.




कार्यक्रमाचे उदघाटन समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी व प्राथमिक विभाग शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर व प्रशालेच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यांनी दीपप्रज्वलन करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देऊन केले.यावेळी शालेय पोषण आहार प्रमुख भगवान जाधव उपस्थित होते.

यावेळी सुमारे २० पालकांनी स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवला. नाचणीचा केक, ज्वारीचा खिचडा, तृणधान्ये भेळ, थालीपीठ, ज्वारीचे मुटके, चकली, मिश्रधान्यांचे वडे, सप्तधान्य लाडू, इडली, अप्पे अशा विविध पदार्थांची रेलचेल यावेळी दिसून आली. माता पालकांमधून प्रथम क्रमांक संपदा अमित घायाळ (तृणधान्य बिस्कीट) , द्वितीय क्रमांक विभागून शीतल रवींद्र धसे (गव्हाच्या कोंड्याचे मुटके) व मनिषा प्रकाश गवळी (ज्वारीच्या पिठाचे बॉल), व तृतीय क्रमांक सविता सावेडकर (मिश्रपीठांचे थालीपीठ) यांनी पटकावला. तसेच प्रशालेतील माता पालक असणाऱ्या शिक्षिका अश्विनी जाधव यांनी तृणधान्ये व कडधान्ये यांचा वापर करून तयार केलेल्या भेळीने सर्वांची मने जिंकले. या सर्वच यशस्वी स्पर्धकांचे सुरेश क्षीरसागर, धनश्री गुंफेकर व सर्व शिक्षकांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे नियोजन व परीक्षण प्रशालेच्या सेमी इंग्रजी शिक्षक - कल्पना दारकुंडे, प्राची देशमुख व अंजली देशपांडे यांनी केले. सुत्रसंचालन सुप्रिया डबीर यांनी केले.

## भगवान महावीर व्याख्यानमाला - पुष्प तिसरे

# आत्मचिंतनातून जीवनातील आनंदाची प्राप्ती - भालेराव





**समाचार/नगर-दि.२४**

जळगाव जिल्ह्यातील असोदा येथील बहिणाबाई चौधरी यांनी निरक्षर असूनही केलेल्या कविता जीवनाचे वास्तव मांडत आत्मचिंतन करायला लावतात. या आत्मचिंतनातून जीवनातील आनंदाची प्राप्ती निश्चितच होते, असे लोककवी इंद्रजीत भालेराव (परभणी) यांनी सांगितले. राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प अरे माणसा माणसा या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते. व्याख्यानमालेचे मुख्य प्रायोजक जयकुंवरबाई मोतीलालजी लोढा यांच्या स्मरणार्थ मनिषा निखिलेंद्रजी लोढा आणि लोढा परिवार आहेत. मनिषा लोढा आणि मनसुखलाल पिपाडा यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे व शिशू संगोपन संस्थेचे व्हा.चेअरमन दशरथ खोसे उपस्थित होते.सरोजताई कटारिया यांनी सूत्रसंचालन केले.

भालेराव म्हणाले, खानदेशी बोली भाषेत बहिणाबाईंनी जीवनाचे सार टिपताना गाव आणि शेती जीवनातील संस्कृती कवितेमधून मांडली आहे. त्यांच्या स्मरणार्थ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नामकरण कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे करण्यात आले. पाठ्यपुस्तकांमध्ये त्यांच्या कवितांना स्थान मिळाले आहे. आचार्य अत्रे यांनी मराठा दैनिकात रविवारच्या पुरवणीत बहिणाबाईंची एक कविता छापत सर्वच्या सर्व ५२ कविता छापल्या. या कविता वाचकांना इतक्या आवडल्या की, दैनिकाचा दीडपट खप वाढला.

बहिणाबाई चौधरी या निरक्षर असूनही त्यांनी काव्यामधून केलेले चिंतन आजही प्रेरणादायी ठरले आहे, असे सांगताना इंद्रजीत भालेराव यांनी म्हणून दाखवलेल्या कवितांना उपस्थित रसिकांनी चांगलीच दाद दिली. शहरासह उपनगरातील ज्येष्ठ स्त्री-पुरूष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले.

## पोलिस कोठडीतील सुमन काळे मृत्यू प्रकरण

# दिरंगाईवर सात दिवसात अहवाल देण्याचे आदेश

**समाचार/नगर-दि.२४**

सुमारे १८ वर्षांपूर्वी पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या सुमन काळे या पारधी समाजाच्या समाज सेविका महिलेच्या प्रकरणाची न्यायालयीन सुनावणीला दिरंगाई का होत आहे ?, आरोपी अद्याप मोकाट का आहेत ? असा प्रश्न उपस्थित करत अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अ‍ॅड. धर्मपाल मेश्राम यांनी रविवारी येथे पोलिसांसह संबंधित प्रशासकीय यंत्रणेला जाब विचारत या संदर्भात येत्या सात दिवसात अहवाल देण्याचे निर्देश दिले. तसेच या प्रकरणात आरोपींवर ट्रॉसिटी कलमानुसार गुन्हा दाखल होऊ शकतो का? याबाबत राज्याच्या महाभियोक्त (अटर्नि जनरल) यांचे मार्गदर्शन घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेशही मेश्राम यांनी दिले. या बैठकी नंतर आयोजित पत्रकार परिषदेत अ‍ॅड. धर्मपाल मेश्राम यांनी माहिती दिली.



आदिवासी पारधी समाजाची महिला सुमन काळे हिचा मे २००७ मध्ये पोलीस कोठडीमध्ये मृत्यू झाला आहे. या प्रकरणात पोलीसच आरोपी असल्याने तपास दिरंगाईने होत असल्याचा आरोप विवेक विचार मंचाने या सामाजिक संस्थेने उपस्थित करत अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे तक्रार केली होती. त्यानुसार आयोगाचे उपाध्यक्ष अ‍ॅड. धर्मपाल मेश्राम यांनी रविवारी नगरला येऊन काळे कुटुंबियांचे म्हणणे जाणून घेतले तसेच शासकीय अधिकाऱ्यांची बैठकही घेतली. या बैठकीला पोलीस अधीक्षक राकेश ओला, अतिरिक्त पोलीस अध्यक्ष प्रशांत खैरे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, राज्य गुन्हे अन्वेषण (सीआयडी) विभागाचे उपाध्यक्ष अविनाश पवार, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, नगर शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे. नागरी हक्क संघटनेचे शैलेश उपासने, माहिती अधिकारी अमोल महाजन आदी उपस्थित होते.

या बैठकीत अ‍ॅड. मेश्राम यांनी संबंधित सर्व शासकीय विभागाचे अधिकाऱ्यांनी सुमन काळे खून खटल्याच्या तपासाला व सुनावणीला दिरंगाईने का होत आहे? याबाबत सर्व संबधित अधिकाऱ्यांनी स्वतः तपास करून सात दिवसात आयोगाला अहवाल द्यावा तसेच मयत सुमन काळे या आदिवासी महिला असल्याने या प्रकरणात ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल होऊ शकतो का नाही याबाबत अटर्नि जनरल यांचे मार्गदर्शन मागवून ट्रॉसिटी नुसार गुन्हा दाखल करावा, असे आदेश दिले. पारधी आदिवासी समाज हा दुर्लक्षित व शोषित वर्ग असल्याने त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यासाठी लोकप्रतिनिधी, पुढारी व बुद्धिजीवी नागरिक व समाजिक संस्थानी पुढाकार घेण्याचे आवाहनही अ‍ॅड.मेश्राम यांनी केले. यावेळी विवेक विचार मंचचे राज्य संयोजक सागर शिंदे उपस्थित होते.



# कृषी विभाग कर्मचारी पतसंस्था; अध्यक्षपदी सुरवसे, शेख उपाध्यक्ष

**समाचार/नगर-दि.२४**

अहिल्यानगर कृषी कर्मचारी सह.पतसंस्थेच्या चेअरमन पदी संतोष सुरवसे, व्हॉईस चेअरमनपदी अल्ताफ शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्ही. के. मुटकुळे यांनी काम पाहिले.

नूतन चेअरमन व्हॉईस चेअरमन यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी माजी व्हाईस चेअरमन संजय सोनवणे, मोतीराम रहाणे, विजय सोमवंशी ,गणेश जगदाळे ,अनिलकुमार शेजुळ, जयश्री कुटे, कविता मदने ,राजेश तुंभारे ,सुकदेव जमधडे, गोरक्षनाथ पठाडे, नितीन चौरे, कैलास बुंदले ,सार्थक दहिवळे आदींसह सर्व सभासद उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना चेअरमन व्हाईस चेअरमन म्हणाले की सर्व सभासदांनी मिळून आम्हाला काम करण्याची संधी दिली त्या संधीचं आम्ही निश्चितच सोनं करून दाखवू. सर्व सभासदांना बरोबर घेऊन काम करू. आपण सर्वजण शेतकरी कुटुंबातून आलेलो आहोत. जगाचा पोशिंदा शेतकरी आहे . शेतकऱ्यांशी आपली नाळ जोडली गेली आहे. अशा ठिकाणी काम करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे हे आपलं भाग्य आहे. कृषी विभागातील कर्मचारी यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व उच्चशिक्षित मुलांचा तसेच सेवावृत्त सभासद कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान संस्थेच्या संस्थेच्या वतीने करणार असल्याचे ते म्हणाले.

## राष्ट्रीय लोकअदालतच्या माध्यमातून ८ हजार प्रकरणे निकाली

# प्रकरणे निकाली काढण्यात जिल्ह्यात जामखेड प्रथम

**समाचार/जामखेड-दि.२४**

लोक अदालत ही न्यायालयीन लढाई विनाखर्च व वेळेची बचत करुन संपविण्याचा सहज व सोपा मार्ग आहे. पक्षकारांनी एकदा तरी याचा अनुभव घ्यावा. नाहीच तडजोड होऊ शकली तर न्यायालये कायद्याप्रमाणे योग्य निर्णय देतीलच, पण एकदा लोक अदालतीच्या माध्यमातून तडजोडीसाठी प्रयत्न करावे. त्याचप्रमाणे विधिज्ञांनी त्यांच्या पक्षकारांना लोकन्यायालयाबाबत जागरूक व प्रोत्साहित करावे असे आवाहन जामखेडचे दिवाणी व प्रथम न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष वैभव जोशी यांनी केले. शनिवारी झालेल्या या राष्ट्रीय लोक अदालीत १०२४% प्रकरणे दाखल झाली त्यातील ८१६० प्रकरणे निकाली काढण्यात आली यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात जामखेडने प्रथम क्रमांक पटकाविला आहे.



शनिवार दि.२२ रोजी जामखेड न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जामखेडचे दिवाणी व प्रथम न्यायाधीश वैभव जोशी बोलत होते. यावेळी

गटविकास अधिकारी शुभम जाधव, तालुका वकील संघाचे अध्यक्ष अँड. प्रमोद राऊत व त्यांचे सहकारी, न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना न्यायाधीश जोशी म्हणाले, आपसी समझौत्याने मिटणारी प्रकरणे निकाली काढण्यात आली व त्यात जामखेड न्यायालयाचा जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकवला आहे. प्राथमिक खटल्यात १०२१७ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी ८१६० प्रकरणे निकाली काढण्यात येऊन ४७ लाख ९६९६४ रूपये करवसुली झाली तर प्रलंबित प्रकरणात ४१० पैकी १०० प्रकरणे निकाली काढण्यात आली. या दोन्ही प्रकरणाची एकत्रित संख्या १०६२७ असून ८२६० प्रकरणे निकाली काढण्यात आली व ५९ लाख ४९ हजार ५८९ रूपये वसूल करण्यात आली.

**पंचायत समिती जामखेड व तालुक्यातील इतर विभागांच्या मदतीने मागील काही लोक अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात दाखलपूर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला होता. दि. २२ मार्च रोजी झालेल्या राष्टीय लोक अदलातीमध्ये देखील अंदाजे ८५०० पेक्षा जास्त दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली असून यापैकी ८१६० प्रकरणे केवळ ग्रामपंचायतमधील कर वसुली संदर्भात आहेत. या माध्यमातून ३४ लाख पेक्षा जास्त कर वसुली झाली आहे.**

**शुभम जाधव**
गटविकास अधिकारी

नगर शहराचं बाव्वनकशी सोनं

काका



आमचे पारिवारीक स्नेही व मार्गदर्शक

मा.श्री. अरुणकाका जगताप

आपणांस वाढदिवसाच्या सुवर्णमय शुभेच्छा!

A.H. पोखरणा® ज्वेलर्स

शाखा नं. १ - सर्जेपुरा, अ.नगर ✆ 83 53 050505

शाखा नं. २ : सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अ.नगर ✆ 800 700 5001

सर्वात कमी मजुरी दर | प्रशस्त पार्किंगसह



गाळा भाड्याने देणे

महालक्ष्मी चेंबर (अपार्टमेंट) बेसमेंट शॉप नं.बी ३, २२० sq.ft. ऑफिससाठी उपयुक्त फर्निचर आहे. मोरया मंगल कार्यालयासमोर सावेडी

मो. 7720007727



1BHK भाड्याने देणे

वृंदावन हाऊसिंग सोसायटी सावेडीमधील बंगल्यातील वरच्या मजल्यावरील 1BHK भाड्याने देणे आहे.

✻ संपर्क ✻

8999446516



सर्वसामान्यांच्या हितासाठी लढणारे, हाकेला धावून येणारे सर्वमान्य नेतृत्व..

माननीय आमदार

श्री. अरुणकाका जगताप

आपणांस वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !



शुभेच्छुक

तलकसी सामजी सावला

मनिष सावला
श्री महाराष्ट्र दाळ मील

जिनेश सावला
प्रिशा इन्व्हेस्टमेंट

स्टेशन रोड, अहिल्यानगर मोबा. : 9421438706 / 9422021131


## जाहीर निविदा सूचना

**मौजे वाकडी, ता.राहाता, जि. अहिल्यानगर** हे खाली नमूद केलेल्या कामासाठी नोंदणीकृत मजूर संस्था/ नोंदणीकृत अभियंता / जि. प. नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून ब–१ निविदा मागवत आहेत. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालय वाकडी, ता. राहाता येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत रूपये ३००/– रोखीने भरून प्राप्त होतील. दि. २०/०३/२०२५ ते दि. २७/०३/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या निविदा दि.२८/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात शक्य असल्यास हजर असणारे ठेकेदार, त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत येतील. .

| अ. क्र. | कामाचे नाव | योजना | निविदा रक्कम रूपये | टेंडर फी रक्कम | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वाकडी येथील गावांतर्गत रस्ते दुरूस्ती व सार्वजनिक स्वच्छता करणे | १५ वा वित्त आयोग ग्रा.पं. स्तर २०२४–२५ | १८८९१०/– | ३००/– | खुला |

अटी व शर्ती सविस्तर सूचना व माहिती ग्रामपंचायत कार्यालय वाकडी, ता.राहाता येथे पहावयास मिळतील. सदर कामाचे कोणतेही दरपत्रके नाकारण्याचा व उशिरा आलेले कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त दरपत्रके फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**ग्रामपंचायत अधिकारी / सरपंच**
**ग्रामपंचायत वाकडी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर**

ओम साई शिक्षण संस्थेचे

## साई पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज

मांडवे, ता. जि. अहिल्यानगर

### त्वरित पाहिजेत

संस्थेच्या प्राथमिक व ज्युनिअर कॉलेजसाठी खालील पदे संस्था मानधनावर भरणे आहे. तरी पात्र उमेदवारांनी सोमवार, दि ३१/०३/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता (संस्था कार्यालय) मांडवे, ता. जि. अहिल्यानगर येथे मूळ कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

| अ. नं. | तपशील | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | शिक्षक/शिक्षिका | २ | एच.एस.सी डी.एड. (इंग्रजी माध्यम) |
| २. | प्राध्यापक/प्राध्यापिका | ६ | एम.ए./एमएस.सी/ एम.कॉम./बी.एड. विषय– Bio., Che., Phy., Maths, English/Marathi/ Hindi (इंग्रजी माध्यम) |
| ३. | माहिती तंत्रज्ञान ( IT ) | १ | MCA, MCS, MSC COMPUTER |
| ४. | शिपाई | २ | १० वी उत्तीर्ण |

Mo. No. 8956361568 — अध्यक्ष/सचिव

## ग्रामपंचायत बारडगाव सुद्रिक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर

### ब–१ निविदा सूचना

सरपंच/उपसरपंच/ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **बारडगाव सुद्रिक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर** यांकडून **सन २०२४–२५** या आर्थिक वर्षात **ग्रामनिधी ग्रामपंचायत बारडगाव सुद्रिक** अंतर्गत मंजूर असलेल्या खालील कामांची ब–१ निविदा जि. प. अहिल्यानगर यांच्याकडील **खुला विद्युत** कडून एक लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागवित आहोत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बारडगाव सुद्रिक येथील प्रशांत गावडे, रघू पारखे, रामा बापू गावडे आणि विकास मोरे वस्ती येथे वीज पुरवठा करणे, ता.कर्जत | ६,२३,२३८/– | ५९०/– | ६३००/– | ६ महिने |
| २ | मौजे बारडगाव सुद्रिक येथील भिसे वस्ती, जिजाबा गावडे आणि प्रल्हाद गावडे वस्ती येथे वीज पुरवठा करणे, ता. कर्जत | ४,१४,०३७/– | ५९०/– | ४१५०/– | ६ महिने |

१. उपरोक्त कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून, कोरे निविदा संच **दि. २४/०३/२०२५ रोजी १२.०० वाजेपासून दि. ०१/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनादेशाने भरणा करून उपलब्ध आहे.
२. परिपूर्ण भरलेल्या निविदा ग्रामपंचायत कार्यालयात **दिनांक २४/०३/२०२५ रोजी १२.०० वाजेपासून दि. ०१/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** सादर करता येतील.
३. प्राप्त निविदा **दि. ०२/०४/२०२५ रोजी १३.०० वा.** नंतर ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.
४. निविदा संदर्भातील सविस्तर माहिती ग्रा. पं. कार्यालयात पहावयास मिळेल.
५. निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, तसेच प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे सर्व हक्क निम्न स्वाक्षरीत राखून ठेवले आहेत.

**सोबत कागदपत्रे** :– १. जि. प. अ.नगर नोंदणी २. पॅनकार्ड ३. जीएसटी ४. निविदा फी व बयाणा रक्कम भरलेली पावती ५. रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर परिशिष्ट–१ (दि. २८/११/२०१८ आणि ११/०५/२०२२ च्या शासन निर्णयानुसार) ६. परिपूर्ण भरलेला निविदा संच ७. दराचे प्रपत्र ८. अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत बारडगाव सुद्रिक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर**

## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत **मौजे राक्षसवाडी खु., ता. कर्जत, जि. अहिल्यानगर** यांच्याकडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत **मौजे राक्षसवाडी खु., ता. कर्जत,** अंतर्गत खालील काम करण्यासाठी सिलबंद लिफाफ्यात ब–१ निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फी | वर्ग | लेखाशीर्ष | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे राक्षसवाडी खु., ता. कर्जत येथील घरांना नळाच्या पाण्याची जोडणी करणे | १०५२९५/– | १% | २३६/– | खुला | १५ वा वित्त आयोग | ६ महिने |
| २. | मौजे राक्षसवाडी खु., ता. कर्जत येथील परिसर सुशोभीकरण करणे | ९९४०३८/– | १% | ५९०/– | खुला | क वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजना | ६ महिने |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी याबाबतची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात **दि. २४/०३/२०२५ ते दि. ०३/०४/२०२५** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सिलबंद निविदा **दि.०३/०४/२०२५** रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा शक्यतो **दि.०४/०४/२०२५** रोजी **सकाळी ११ वा.** उघडण्यात येतील. निविदा मंजूर–नामंजूर करण्याचा अधिकार **मौजे राक्षसवाडी खु., ता.कर्जत**ने राखून ठेवला आहे. **आवश्यक कागदपत्र** – १) जि. प. नोंदणी प्रमाणपत्र, २) पॅनकार्ड, ३) जीएसटी प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड, ५) सत्यप्रतिज्ञापत्र

**ग्रामपंचायत अधिकारी / सरपंच**
**ग्रामपंचायत मौजे राक्षसवाडी खु., ता. कर्जत, जि. अहिल्यानगर**

## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत **मौजे माळंगी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर** यांच्याकडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत **मौजे माळंगी, ता. कर्जत** अंतर्गत खालील काम करण्यासाठी सिलबंद लिफाफ्यात ब–१ निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फी | वर्ग | लेखाशीर्ष | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे माळंगी, ता.कर्जत येथे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याला पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १३७०९१/– | १% | २३६/– | खुला | १५ वा वित्त आयोग | ६ महिने |
| २. | मौजे माळंगी, ता.कर्जत येथे शाळा खोल्या दुरूस्ती करणे | १२६०९८/– | १% | २३६/– | खुला | १५ वा वित्त आयोग | ६ महिने |
| ३. | मौजे माळंगी, ता.कर्जत येथील डोंबालवाडी येथे घरांना नाली जोडणी करणे | ३४८९९२/– | १% | २३६/– | खुला | १५ वा वित्त आयोग | ६ महिने |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी याबाबतची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात **दि. २४/०३/२०२५ ते दि. ०३/०४/२०२५** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सिलबंद निविदा **दि.०३/०४/२०२५** रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा शक्यतो **दि.०४/०४/२०२५** रोजी **सकाळी ११ वा.** उघडण्यात येतील. निविदा मंजूर–नामंजूर करण्याचा अधिकार **मौजे माळंगी, ता. कर्जत**ने राखून ठेवला आहे. **आवश्यक कागदपत्र** – १) जि. प. नोंदणी प्रमाणपत्र, २) पॅनकार्ड, ३) जीएसटी प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड, ५) सत्यप्रतिज्ञापत्र

**ग्रामपंचायत अधिकारी / सरपंच**
**ग्रामपंचायत मौजे माळंगी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर**


UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
UNITED PHARMA
9049934444
7972378081
9822020649






Milk & Cream Icecream Product

HATSUN Daily

प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर ✆7219515144





लाडके आमदार संग्रामभैय्या जगताप

आनंददायी अरुणोदय

नगरीत होतोय नव आरोग्यमंदिराचाही अभ्युदय...




मा. आ. अरुणकाका जगताप

वाढदिवसा निमित्त हार्दिक

अभिष्टचिंतन

✻ शुभेच्छुक ✻

चंपालाल, पंडीतलाल, विजयकुमार, दिलीपकुमार, सुभाषलाल,
वैभव, पवन, परेश, शुभम, सौरभ, अक्षय

एवम् गांधी परिवार – शिरुर (घोडनदी)

SS Gandhi Construction Pvt. Ltd.

GC

Gandhi Construction

शिरुर – अहमदनगर – पुणे